शनिवार, १५ मार्च २०२५

⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०४ ⊙ अंक - २०१

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 15 MARCH 2025 | adhunikkesari.com | ● YEAR-4 ● ISSUE-201 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# सोलापुरात बर्ड फ्लू

## मृत कावळ्यांचा रिपोर्ट समोर; प्रशासन अलर्ट



आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर : मागील काही दिवसात शहरात अचानक मृत पावलेल्या कावळ्यांचा मृत्यू हा बर्ड फ्लूमुळेच झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे. भोपाळ येथील लॅबमधून मृत कावळ्यांचे रिपोर्ट हे बर्ड फ्लू पॉसिटीव्ह आढळल्याने सोलापूर महापालिका आणि पशुसंवर्धन विभाग अँक्शन मोडवर आले आहे. शहरात बर्ड फ्लूचा शिरकाव झाल्याने सर्वत्र एकाच खळबळ उडाली आहे.**

सोलापुरातील छत्रपती संभाजी महाराज तलाव, श्री सिध्देश्वर महाराज तलाव, खंदक बाग या परिसरात मागील काही दिवसात पन्नासहून अधिक कावळ्यांचा मृत्यू झाला होता. या कावळ्यांचा मृत्यू हा बर्ड फ्लूनेच झाल्याचे आता स्पष्ट झाल्याने मृत कावळे आढळून आलेले परिसर निर्जंतकीकरणाला सुरुवात झाली आहे. तसेच मृत कावळे आढळून आलेले परिसर हे नागरिक फिरण्याचे परिसर असल्याने खबरदारी म्हणून 21 दिवस बंद केले जाणार आहेत. तर 1 किलोमीटर परिसरातील चिकन शॉप्समधील कोंबड्याची देखील तपासणी होणार आहे. तसेच आरोग्य विभागामार्फत 1 किलोमीटर परिसरातील आजारी नागरिकांची देखील माहिती घेतली जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. मात्र अद्याप कोंबड्यात आणि माणसामध्ये कोणत्याही पद्धतीने बर्ड फ्लूचा शिरकाव झालेला नाही, त्यामुळे घाबरण्याची आवश्यकता नाही, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

बर्ड फ्लूला एव्हियन इन्फ्लूएन्झा म्हणूनही ओळखले जाते. हा एक विषाणूजन्य संसर्ग आहे जो केवळ पक्ष्यांनाच संक्रमित करत नाही तर हा विषाणू मानव आणि इतर प्राण्यांना देखील संक्रमित करू शकतो. यातील बहुतेक विषाणू पक्ष्यांपर्यंतच मर्यादित असले तरी पक्ष्यांसाठी हा रोग प्राणघातक आहे. या रोगाचे विविध प्रकार आहेत. H5N1 मध्ये दीर्घकाळ टिकून राहण्याची क्षमता आहे. H5N1 ची लागण झालेले पक्षी 10 दिवसांपर्यंत विष्ठा आणि लाळेत विषाणूच्या रूपात सोडत राहतात. दूषित क्षेत्राच्या संपर्कात आल्याने संसर्ग पसरू शकतो. दरम्यान सतत स्थलांतर करणाऱ्या पक्षांमध्ये याचे प्रमाण अधिक असल्याने याचा धोकाही अधिक आहे.

# अधिपरिचारिका अधिकारी, समाजसेविका श्रीमती क्रांती आईलवार यांना दै. आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र-2025' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज






**तानाजी शेळगावकर**

**नायगाव :** मौजे सुजलेगाव (ता. नायगाव, जि. नांदेड) येथील अधिपरिचारिका अधिकारी व समाजसेविका श्रीमती क्रांती देवराव आईलवार यांना दैनिक आधुनिक केसरीचा आयडॉल महाराष्ट्र-2025 हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

श्रीमती क्रांती आईलवार यांनी हलाखीच्या परिस्थितीत बारावी सायन्सपर्यंत शिक्षण घेऊन पुणे येथील ससून रुग्णालयात जीएनएम केले व 2005 मध्ये डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय नांदेड येथे अधिपरिचारिका म्हणून रुजू झाल्या. हलाखीच्या परिस्थितीवर मात करून त्यांनी जॉब मिळवला. गेल्या 22 वर्षांपासून त्या समाजसेवा हीच ईश्वरसेवा, रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा, हे ब्रीदवाक्य मनाशी बाळगून रुग्णांची सेवा करत समाजसेविका म्हणून काम करतात. रक्तदान, महिलांच्या व पुरुषांच्या समस्यांचे समुपदेशन करतात. गोरगरीब रुग्णांची काळजी घेतात आणि वेगवेगळ्या विषयांवर महिलांना मार्गदर्शन करून त्यांना जागृत करण्याचा नेहमी प्रयत्न करत असतात. गेल्या बावीस वर्षांपासूनची ही अखंड सेवा निरंतर चालावी ह्या उद्देशाने दैनिक आधुनिक केसरीने समाजसेविका, अधिपरिचारिका अधिकारी क्रांती आईलवार यांना आयडॉल महाराष्ट्र 2025 हा पुरस्कार जाहीर केल्याबद्दल त्यांचे समाजाच्या सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



# तलावातून अवैध पाणी उपसा; कारवाई करणार कोण? मार्चमध्येच पाणीटंचाईच्या झळा

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजी लांडे**

**वडवणी :** वडवणी तालुक्यामध्ये दोन मध्यम प्रकल्प आणि चार लघु प्रकल्प आहेत तसेच अनेक गावांमध्ये गाव तलाव पाझर तलाव ही आहेत पाझर तलावातील पाणी पंधरा दिवसच पुरेल एवढाच पाणीसाठा राहिलेला आहे यावर्षी समाधानकारक पाऊस झाला असला तरीही मध्यम प्रकल्प सोडता लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेले नव्हते अशातच तिगाव,साळींबा चिंचोटी, मामला या लघु प्रकल्पांमधून बेसुमार पाणी उपसा सुरू असून यामुळे पाणीटंचाईच्या झळा मार्चमध्ये जाणवणार आहेत तिगाव साळींबा चिंचोटी मामला या तलावामध्ये विद्युत मोटार मोठ्या प्रमाणावर आहेत, असे असताना देखील याकडे वडवणी तहसील प्रशासन आणि संबंधित विभाग दुर्लक्ष करत असून लघु प्रकल्पांमध्ये महिनाभर पुरेल इतकाच पाणी साठा शिल्लक असताना देखील अवैध पाणी उपसा करणाऱ्या वर कुठलीच कारवाई होत नसल्याने यावर्षी तालुक्याला पाणीटंचाईच्या तीव्र झळा सोसाव्या लागणार आहेत.तसेच या तलावातून अवैध पाणी उपसा करण्यासाठी विज चोरून वापरली जात असल्याचे दिसत आहे एका विद्युत पोल वर 25 ते 30 आकडे टाकलेले असताना देखील विद्युत विभाग देखील विज चोरी करणाऱ्या वर कारवाई करत नसल्याने वडवणी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध पाणी उपसा सुरू आहे.



**विहीर बोअरचे पाणी आटू लागले** : वडवणी तालुक्यातील पाणी पातळी दिवसे न दिवस खोलवर जात असून यावर्षी फेब्रुवारी महिन्यातच विहीर बोअर ची पाणी पातळी खालावली असून अनेक विहिरीनी तळ गाठला असून बोअर देखील बंद पडू लागले आहेत. त्यामुळे यावर्षी वडवणी तालुक्यातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे

**कारवाई कोण करणार?** : तालुक्यातील सर्वच तलावातून अवैधरित्या पाणी उपसा सुरू असताना देखील याकडे वडवणी तहसील प्रशासन विद्युत विभाग आणि या तलावाचे संबंधित विभाग हे तीनही विभाग कारवाई करत नसल्याने तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध पाणी उपसा सुरू आहे.

लवकरच पथक तयार करून अवैध पाणी उपसा चालू आहे अशा ठिकाणी कारवाई करण्यात येईल तसेच अवैध पाणी उपसा करणारे मोटर ही जप्त करण्यात येतील. **वैभव महेंद्रीकर, तहसीलदार**

# महावितरणचा गलथान कारभार; शेतकऱ्याचा सीताफळ बागेवर जेसीबी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**


**धाराशिव : कळंब तालुक्यातील तांदुळवाडी ह.मु कळंब येथील शेतकरी भारत चोंदे यांनी कमी दाबाने वीजपुरवठा तर कधी ट्रान्स्फर जळाल्याने लागवडीचा खर्चही न निघाल्याने हाताश होउन सिताफळ बागावर जेसीबी फिरविला आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, कळंब तालुक्यातील तांदुळवाडी शिवारातील शेतकरी भारत चोंदे यांनी सिताफळ बागावर जेसीबी फिरवून सिताफळ बाग केली नष्ट भारत चोंदे यांनी गट नंबर 190 मधील क्षेत्रात सन 2019 मध्ये सिताफळ बागाची केली होती लागवड पण गेली दोन ते तीन वर्षांपासून विद्युत वितरण कंपनीच्या हलगर्जीपणा मुळे कमी विद्युत पुरवठा तर कधी ट्रान्स्फर जळाल्याने व रुणवाल डिपी वरुन अनाधिकृत पणे काही शेतकऱ्यांनी विज जोडणी केल्यामुळे त्या डिपीवर खुप लोड येत असल्याने कमी दाबाने वीजपुरवठा होत होता याकडे महावितरण कर्मचाऱ्यांनी लक्ष न दिल्यामुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे. गेल्यावर्षी नियोजन समितीच्या बैठकीत प्रताप डिकले यांच्या शेतामध्ये नविन डिपी प्रस्ताव दाखल केला होता पण त्याचा काही उपयोग झाला नाही त्यामुळे विद्युत पुरवठा सतत खंडित होत असल्याने व वेळोवेळी ट्रान्स्फर जळाल्यमुळे पोटच्या मुलाप्रमाणे जपलेल्या सिताफळ बागावर जेसीबी फिरवून पुर्ण बाग नष्ट केली आहे ही दुर्दैवी घटना घडली आहे भारत चोंदे यांनी व्याजाने व बॅंकेकडुन कर्ज काढून सिताफळ लागवड केली व वाढवली,फुलवली मात्र नेहमीप्रमाणेच शेतकऱ्यांच्या नशिबी आले दुःखच सिताफळ लागवडीसाठी लाखो रुपये खर्च केला पण मजुरीचाच काय लागवडिचाही खर्च निघाला नाही या मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे हताश झालेले शेतकरी भारत चोंदे यांनी आपल्या शेतातील सिताफळ बागावर जेसीबी फिरवून पुर्ण बाग नष्ट केली नुकसानीच्य झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांचा पाठिशी हे सरकार उभे राहिल का ? हाच खरा प्रश्न उपस्थित होत आहे.

**हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी नाही** : आमचा पुर्ण उदरनिर्वाह शेतीवर चालतो मी अल्पभूधारक शेतकरी असुन दोन एकरात सिताफळ लागवड केली होती या बागावर कमीत कमी दोन लाखांपेक्षा जास्त खर्च केला मात्र आत्तापर्यंत हातात एक रुपया सुध्दा आला नाही सरकारच आमचे माय बाप आहे मात्र हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी नाही तसेच मजुरीच्या निंदनिचा खर्च पण निघाला नाही या फळ बागेतून चार ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा होती शासनाला शेतकऱ्यांचे आर्थिक संकट कदाचित दिसणार नाही मात्र या शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू नक्कीच दिसतील अशी अपेक्षा आहे अस्मानी व सुलतानी संकटाबरोरच महावितरणच्या कर्मचारी,अधिकाऱ्या मुळे शेतकरी चहुबाजूंनी संकटात सापडला आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी



## रंगांचा उत्सव : होळी ते रंगपंचमी

आपण भारतीय सण, उत्सव साजरे करण्यात आघाडीवर आहोत. आपल्या सगळ्या सणांचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते सगळे निसर्गाशी आणि पर्यावरणाशी जोडले आहेत. आपले आरोग्य, जीवनशैली आणि अध्यात्म यांच्याशी त्यांची एक अतूट अशी नाळ जुळलेली आहे. होळी येते तेव्हा भोवतालचा निसर्ग आपले रूप बदलत असतो. पानगळ होऊन झाडांना नवी पालवी येत असते. वृक्षांना बहर येतो. आंब्याच्या मोहराने भोवतालचा परिसर धुंद सुगंधी होऊन गेलेला असतो. अशातच कडक थंडी नाहीशी होऊन उन्हाळ्याची चाहूल लागलेली असते आणि अशातच फाल्गुन पौर्णिमेला होळीचा सण येतो. या पौर्णिमेलाच हुताशनी पौर्णिमा असेही म्हटले जाते. आपल्या इतर अनेक सणांप्रमाणेच हा सण अमंगलातून मंगलाकडे, वाईटाकडून चांगल्याकडे जाण्याची प्रेरणा देतो. भक्त प्रल्हादाची कथा आपण सगळे जाणतो. प्रल्हाद हा विष्णूचा भक्त होता. त्यामुळे त्याचा पिता हिरण्यकश्यपू याने त्याला मारण्याचे अनेक प्रयत्न केले. ते सगळे अयशस्वी ठरले. शेवटी आपल्या बहिणीला म्हणजे होलिकेला प्रल्हादाला मांडीवर घेऊन जाळण्यासाठी हिरण्यकश्यपुने सांगितले. होलिकेला अग्नी जाळू शकणार नाही असे वरदान होते. त्यामुळे तिच्या मांडीवर फक्त प्रल्हादाचा जळून मृत्यू होईल असा हिरण्यकश्यपू आणि होलिका यांचा अंदाज होता.

## लोकं निंदेला घाबरू नका

आधुनिक केसरी


सत्य मार्गावर सर्वात जास्त त्रास अवहेलना होते हे वास्तव आहे. मात्र हा बिकट मार्ग कितीही संकटं काळात सोडता कामा नये. जीवनातील प्रगती मार्गावर प्रमुख काही अडथळे असतात आणि हे अडथळे पार करता आले तर जीवन यशस्वी होत. लोक आपल्याला काय म्हणतील याची अजिबात काळजी चिंता करू नका.आपण आपल्या जीवनातील बहुतांश वेळा हा इतरांच्या आपल्या विषयी असणार्या मतांवर चिंतन करण्यासाठी घालवतो. मुळात हि आपली सवय पद्धत चुकीची आणि आपल्यासाठी अहितकारक आहे. आपण आपलं कार्य प्रमाणिक आणि निष्ठापूर्वक करणं गरजेचं आहे. बाकी त्या कार्य विषयी निर्माण होणारी मत हि आपण दुर्लक्षित करण हेच आपल्यासाठी लाभकारी लाभदायक आहे. आपण करत असलेल्या कार्याचा मार्ग सत्यनिष्ठ लोक हितकारक, असेल तर इतरत्र आजुबाजुला येणाऱ्या प्रतिक्रिया यावर फारसा लक्ष देऊ नका आणि आपल्या कार्यापासून भटकु नका लोक निंदा हि एक विशिष्ट कालावधी मध्ये होतच असते. सुर्य कितीही जरी तळपला म्हणून काय समुद्र अटतो का ? समुद्र आपल्यावर सुर्याच्या तळपण्याचा परिणाम करून घेत नाही.तसच आपण सुद्धा लोक निंदेला घाबरून आपलं कार्य थांबवु नये.नकारात्मक विचार शक्यतो आपल्या आजूबाजूला फिरकता कामा नये.नकारात्मकता हि दिशाहिन स्थिती असते.शक्यतो या स्थिती पासुन दुर राहण उत्तम असतं.लोक आपल्या बद्दल किती ही नकारात्मक बोलु द्या.जर आपल्याला यशस्वी होयच असेल तर आपण तिकडे लक्ष देवू नये.आपण आपलं जीवन आपल्या कर्म फलानुसार जगत असतो.मग इतरांच्या मतानुसार आपल्या मध्ये बद्दल अथवा मतानुसार प्रभावीत होण्याची आवश्यकता नाही.सुर्य तळपला म्हणजे समुद्र आटत नाही लोक निंदा हि लोकांचं त्यांच्या विवेकानुसार व्यक्त झालेलं मत असत. आपण त्याच चिंतन अथवा मंथन करण्याची अजिबात आवश्यकता नाही.पण आपण हे समजुन घेण्यात गोंधळतो आणि आपल्या कार्या पासुन अनेक वेळा दुर होतो. निंदानालस्ती, टवाळी, टिंगल झाली तर फार काही घाबरण्याचे काम नाही. मात्र याच वेळी आपला जीवन रथ हा सत्याच्या मार्गावर असला पाहिजे.आपलं आयुष्य हे आपलं असतं.आपल्या अस्तित्वा पेक्षा या जगात काहीच मोठं नाही. आयुष्यच्या मार्गावर आपण चालत असताना सत्याचा न्यायाचा धर्माचा मार्ग सोडायचा नाही या मार्गावरून मार्गक्रमण करताना आपण एखाद कार्य मग ते आपल्या स्वतःसाठी असेल अथवा लोक कल्याणकारी असेल. नैसर्गिक न्याय धर्माच पालन करणार असल पाहिजे त्या सोबतच निति मुल्य संवर्धन करणार असेल तर अशा कार्याला कितीही विघ्न संकटं आली अडचणी समस्या निर्माण झाल्या तरी देखील असं कार्य चुकुन सुद्धा थांबवु नका.लोक निंदेला घाबरून तर नक्कीच नाही.जसं समुद्राच्या विराटतेसमोर किती ही विघ्न निर्माण झाली.वादळ सुटली  एव्हण सुर्य जरी आग ओकू लागला अथवा सुर्यने कितीही प्रखर आणि दाहक उष्णता उत्सर्जित केली तरी समुद्राला याचा काय परिणाम होऊ शकतो का ? तर यत्किंचितही देखील नाही महणजे समुद्र आपल्या ठिकाणी स्थिर आहे.कोणत्याही बाह्य शक्तीच्या प्रभावाचा परिणामाचा समुद्राच्या अस्तित्वावर होणार विपरीत परिणाम होत नाही. तसच आपल्या जीवनात सुद्धा असलं पाहिजे आपण जेव्हा एखाद्य लोक उपयोगी अथवा स्वतःचा उत्कर्ष होण्यासाठी किंवा मनातील सुप्त इच्छा यशस्वी करण्यासाठी कार्य हाती घेतो.तेव्हा त्या कार्य बद्दल चांगले वाईट अभिप्राय मिळु शकतात ते मिळण तसं कठीण नाहीच.त्याच्याही पुढे जाऊन आपल्याला लोक निंदेला समोर जावा लागु शकत.असं योगायोगाने झालं तर आपण आपला मार्ग सोडणार का ? तर नक्कीच नाही सोडला पाहिजे.तर आणि तरच आपलं हित उपयोग होईल.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## नाम भावयुक्त अंतःकरणाने घ्यावे ।

आधुनिक केसरी



मला आज देवाची गरज अशी वाटत नाही हे खरे, पण ती कशी वाटेल याचा तरी आपण विचार करावा. भगवत्चिंतनाने, नामाने ही गरज भासू लागते. गरज इतकी भासली पाहिजे की, अन्नपाणीसुद्धा गोड लागू नये. जितकी आग जोराची तितका पाण्याचा मारा जास्त हवा, तसे जितकी देहबुद्धी बळकट तितका नामाचा जोर अधिक पाहिजे. नामात प्रेम नाही म्हणून ते घेण्याचे सोडू नये. पाण्यात पडल्यावर पुढे पोहायला येते. काशीला गेले नाही तरी काशीस जायचे असे तरी म्हणावे; त्याप्रमाणे नामात प्रेम वाटत नसले तरी, नामात प्रेम आहे असे नित्य म्हणावे. नामाशिवाय दुसरे सत्य नाही, दुसरे साधन नाही, असा दृढ विश्वास झाला म्हणजे नाम घेतल्याशिवाय राहवत नाही ; आणि ते घेतल्याने, त्याच्या सहवासाने, त्याचे प्रेम येते. संत देव आहे असे म्हणतात, मीही देव आहे असे म्हणतो; फरक इतकाच की, माझे म्हणणे अनुमानाचे असते, त्यांचे प्रत्यक्ष अनुभवाचे असते. संत देहातीत असतात; त्यांच्याजवळ गेल्याने देहाभिमान कमी होतो. प्रत्यक्ष गेले नाही तरी चालेल; भाव ठेवून कार्य जितके लवकर होते तितके देहाच्या सहवासाने होत नाही. तीर्थास तीर्थपण, देवांस देवपण आणि गुरूंस गुरूपण आपण आपल्या भावनेने देतो. तीर्थास जाऊन जर 'आपण याने निष्पाप होऊ' अशी भावना असली तरच मला तीर्थाचे स्नान होईल, नाहीतर मला ते नुसते पाणीच आहे ! थोडक्यात म्हणजे, सर्व काही भावनेत आहे. नाम हे भाव उत्पन्न करते. भावयुक्त अंतःकरणाने आपण नाम घेतले म्हणजे आपले काम शीघ्र होते. साधूंची अगर संतांची लक्षणे आपल्या अंगात ती बाणून घेण्याकरिता सांगितली आहेत. परंतु त्या लक्षणांवरून साधू ओळखता येणार नाही; साधू होऊनच त्याला ओळखले पाहिजे. प्रापंचिकाला त्याला ओळखायचे असेल तर त्याने आपल्यावर त्याच्या संगतीचा काय परिणाम झाला हे पाहावे; म्हणजे आपल्यावरूनच त्याला ओळखायचे. आपल्या मनाला काही वेळ तरी शांती मिळाली, आपला मीपणा थोडा तरी कमी झाला, मन निर्विषय झाले, निदान निर्विषय राहावे असे वाटू लागले, तर ते साधूचे स्वरूप आहे असे समजावे. साधू सर्वांभूती भगवद्‌भाव किंवा सर्वत्र मीच आहे असे पाहतात. त्यामुळे सर्वांवर ते प्रेम करतात. सर्वत्र प्रेम करायचे म्हणजे निःस्वार्थ बुद्धीने योग्य ते करणे. आपण आपलेपणा काहींमध्येच पाहतो, सर्वत्र पाहात नाही, म्हणून द्वैतप्रचीती येते. साधूंचा मीपणा गेल्याने जगात त्यांना सर्वत्र अभेदप्रचीती येते. ते सर्वत्र भगवद्‌भाव पाहतात, आणि त्यांचे प्रेम अगदी निर्भेळ असते.



आधुनिक केसरी

## राम कृष्ण तारी | संसारात ||

दुःख दुःख काय | उगाळतो वेड्या ||
कोळसा का गड्या | शुभ्र होतो ||१||
घाणीचे साम्राज्य | वराहा आवडे ||
क्षीर नीर निवडे | राजहंस ||२||
नकारी विचार | सुखाला आडवी ||
दुःखाला पळवी | सकारी हा ||३||
रडगाणे कधी | गाऊ नये राजा ||
फुकाचीच सजा | भोगु नये ||४||
व्हायचे ते होते | अटळ हे जाण ||
प्रारब्ध भोगुन | मुक्त व्हावे ||५||
श्रध्दा युक्त कर्म | दुःखास निवारी ||
राम कृष्ण तारी | संसारात ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## तुका म्हणे...

आधुनिक केसरी




**संत तुकाराम महाराज यांच्या एका अभंगाचे आध्यात्मिक स्पष्टीकरण आणि या अभंगाचा गूढ सखोल सखोल अर्थ :** संत तुकाराम महाराजांनी या अभंगातून शुद्ध वाणी, सत्संगती, परोपकार आणि आत्मशुद्धी यांचा महत्त्वाचा संदेश दिला आहे.

माणसाच्या जीवनात वाणीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शब्द हे तलवारीसारखे असतात. ते दुसऱ्याला सुखद अनुभव देऊ शकतात किंवा खोल जखमही करू शकतात. सदा तळमख। चित्ताचिये हळहळ ॥१॥" या ओळींत संत तुकाराम महाराज अत्यंत गूढ तत्त्वज्ञान सांगतात. माणसाच्या चुकीच्या बोलण्यामुळे त्याला शेवटी पश्चात्ताप करावा लागतो. वाणीचा दुरुपयोग केल्याने मनात सतत तळमळ आणि दुःख निर्माण होते. संत तुकाराम महाराज म्हणतात की, जसे मृतदेह जाळताना चितेवर हळहळ होते, तसेच वाईट वाणीमुळे होणारे नुकसान अपरिहार्य असते.

- माणूस कितीही श्रीमंत किंवा विद्वान असला तरी त्याच्या वाणीतील कटुता आणि द्वेष त्याला नष्ट करतात. "त्याचें दर्शन न व्हावें। शव असतां तो जीवें ॥ध्रु॥" या ओळीत संत तुकाराम महाराज अत्यंत गंभीर विचार मांडतात.

- वाईट लोकांचा सहवास हा मृत शरीरासारखा असतो. जसा मृतदेह दुर्गंधीयुक्त असतो, तसेच अशा लोकांचा सहवास अस्वस्थता निर्माण करतो.


- दुर्जन व्यक्तींचे दर्शन होऊ नये, त्यांच्याशी संबंध ठेवू नये. त्यांच्याशी मैत्री करणे म्हणजे स्वतःचे जीवन नष्ट करणे. वाईट विचारसरणी असणाऱ्या लोकांबरोबर राहिल्यास माणसाच्या स्वभावावरही परिणाम होतो. आत्म्याचा खरा विकास व्हायचा असेल, तर अशा लोकांपासून दूर राहावे.

"कुशब्दाची घाणी। अमंगळविली वाणी ॥३॥" संत तुकाराम महाराज येथे वाणीच्या शुद्धतेचा महत्त्वाचा विचार मांडतात.

- कुशब्द म्हणजे वाईट, कठोर आणि अपशब्द होय. अशा शब्दांचा उपयोग केल्याने जीवनात संकटे निर्माण होतात. - जेव्हा माणूस सतत वाईट बोलत असतो, तेव्हा त्याच्या जीवनात नकारात्मकता निर्माण होते आणि त्याचा परिणाम त्याच्या कुटुंबावर, समाजावर आणि त्याच्या आत्म्यावर होतो. सतत कटु बोलणाऱ्या व्यक्तीची वाणी अमंगळ होते. अमंगळविली वाणी" – म्हणजे अशी वाणी जी दुसऱ्याला दुःख देते, जी कोणालाही आनंद देत नाही, ती वाणी उपयोगाची नाही. "नेणे शब्दपर। तुका म्हणे परउपकार ॥४॥" संत तुकाराम महाराज येथे सांगतात की, शुद्ध वाणीचा उपयोग परोपकारासाठी करावा. परमार्थ आणि परोपकार यासाठी वाणीचा उपयोग केला पाहिजे. वाईट वाणीने माणूस स्वतःच नाश पावतो, तर गोड वाणीने लोकांच्या हृदयात स्थान निर्माण होते. - शुद्ध वाणी ही परोपकाराचे साधन असते. ती समाजासाठी उपयोगी ठरते. म्हणूनच संत तुकाराम महाराज सांगतात की, परोपकारासाठी वाणीचा उपयोग केला पाहिजे.

या अभंगातून शिकण्यासारखे महत्त्वाचे धडे : **१. चांगल्या वाणीचे महत्त्व :** वाणीमध्ये गोडवा असला पाहिजे. कठोर आणि कटु शब्द टाळावेत. आपली वाणी दुसऱ्याला दुःख देणारी नसावी, तर आनंद देणारी असावी.२. वाईट लोकांपासून दूर राहावेः - दुर्जन माणसांचा सहवास टाळावा. त्यांच्या सहवासाने आपले विचार दूषित होतात. वाईट लोकांशी संबंध ठेवल्यास आपले जीवनही नष्ट होते. **३. परोपकार करावा :** वाणीचा उपयोग परोपकारासाठी करावा. दुसऱ्यांचे भले करणारी वाणी आणि कृती माणसाला श्रेष्ठ बनवते. **निष्कर्ष :** संत तुकाराम महाराज या अभंगातून वाणीची शुद्धता, सत्संगती, वाईट संगतीपासून दूर राहणे आणि परोपकार यांचा महत्त्वाचा संदेश देतात. वाईट वाणीमुळे माणसाचे जीवन नष्ट होते, तर चांगल्या वाणीने समाजात मान-सन्मान मिळतो.

- दुर्जन व्यक्तींपासून दूर राहणे आवश्यक आहे. त्यांचे दर्शनही टाळले पाहिजे. परमेश्वराने दिलेली वाणी सत्कर्मासाठी, परोपकारासाठी आणि भक्तीसाठी वापरावी. तुका म्हणे परोपकार" – म्हणजेच आपल्या वाणीचा उपयोग दुसऱ्याच्या भल्यासाठी करावा. हेच या अभंगाचे अंतिम तत्त्वज्ञान आहे – शुद्ध वाणी आणि परोपकार हाच खऱ्या भक्तीचा मार्ग आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद ©

## छत्रपती राजारामराजे भोसले

आधुनिक केसरी

यावरून राजाराम मह. राजांचा लढा किती विचित्र होता याची कल्पना करता येते. मिर्झा राजाच्या वेळेस शिवाजी महाराजांनी स्वराज्याची कल्पना पार शेवटच्या थरापर्यंत रुजविली होती, पण राजारामाच्या काळात ती पूर्णपणे उखडली गेली होती. मराठी सैन्यात त्यावेळेस साधारण (वतनदारी मिळून) ३०,००० ते ५०,००० इतके सैन्यपण भरत नव्हते. एकास साडेतीन असा हा लढा होता. शिवाय मोगलांबरोबर हत्ती, तोफखाना हे सर्व, तर मराठ्यांचे सैन्य हे तलवार, बर्च्या व ढाली एवढेच घेऊन लढत होते. सन १६७९ ते १७००पर्यंत महाराष्ट्रावर सतत स्वाऱ्या होत होत्या. दुष्काळ, जाळपोळ यामुळे महाराष्ट्र खचून गेला होता. राज्याची तिजोरी नाही, राजा परागंदा(?), पुरेशी फौज नाही अशा काळात वतनदाऱ्या बहाल करण्याशिवाय दुसरा पर्याय राजाराम महाराजांसमोर नव्हता असे मत आहे. पण नंतर याचे भयंकर दुष्परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागले. सततची धावपळ, सोबत वाईट प्रकृती यामुळे राजाराम महाराज लवकरच वारले. छत्रपती राजाराम वारल्यावर स्वराज्य परत एकदा डळमळीत झाले. राजाराम महाराजांना दोन पुत्र होते. संभाजी (दुसरे) आणि शिवाजी (तिसरे). ह्यांपैकी राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर कर्णाला गादीवर बसवल्याचा उल्लेख रिसायतकार करतात पण तो ३ आठवड्यात वारला. गादी परत पोरकी झाली. संभाजी दुसरे हे राजसबाई आणि राजाराम महाराज ह्यांचे पुत्र होते. राजाराम हा मुळात शांत स्वभावाचा माणूस होता. त्याने राज्यकारभाराची घडी व्यवस्थित घालण्याचा प्रयत्न केला व त्यात तो बऱ्यापैकी यशस्वी झाला. व्यक्तिगतरीत्या तो गुणी, धोरणी व मुत्सद्दी राजकारणी होता. एका पत्रात त्याने दिल्लीवर स्वारी करायची इच्छा व्यक्त केली. काळ पाहिला तर औरंगजेब दक्षिण गिळंकृत करत होता, राजारामाकडे पैसे नव्हते, पुरेसे सैन्य नव्हते आणि हा माणूस दिल्लीला घशात घालू या असे त्याच्या अनुयायांना पत्राद्वारे लिहीत होता. काय म्हणावे ह्या धैर्याला? बेडर वृत्ती, धाडसीपणा की आणखी काही. (इतिहासाची पुनरावृत्ती होते म्हणतात, ती लगेच झाली. १७२८ला साली निझामाने पुणे घशात घातल्यावर बाजीरावाने औरंगाबादवर हल्ला चढविला) हे गुण राजारामाला त्याच्या वडिलांकडून आले.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १५ मार्च २०२५

adhunikkesari.com


# नारी शक्ती शिवाय जग हे परिपूर्ण होऊच शकत नाही

## डॉ. लताताई भोसले बाहेकर : सन्मान नारीशक्तीचा पुरस्कार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जामोद) :** नारीशक्ती जी दातृत्व, कर्तृत्व, मातृत्व व नेतृत्व या चारही बाजूने निसर्गाने नटवलेली एक अद्‌भुत शक्ती आहे. महाकाली, चंडिका, भवानी, ही सर्व नारी शक्तीची रूपे आहेत. जिजाऊ, अहिल्या, रमाई, सावित्री यांनी एक नवं परिवर्तन घडवले आहे. तिच्याशिवाय हे जग अपूर्णच आहे. स्त्री शक्ती ही पुरुष शक्ती पेक्षा वेगळी नसून समान आहे. दोन्हीही शक्ती एकमेकांशिवाय अपूर्णच असल्या तरी जग हे नारी शक्ती शिवाय परिपूर्ण होऊच शकत नाही", असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.सौ. लताताई भोसले बाहेकर यांनी व्यक्त केले. त्या दिनांक ९ मार्च रोजी महिला दिनाच्या उत्तरार्धावर स्थानिक नगरपरिषद सांस्कृतिक भवन मध्ये "सन्मान नारी शक्तीचा" या कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. सौ.जिजाताई राठोड चांदेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. जळगाव (जामोद) येथील मूळ रहिवासी प्रसिद्ध त्वचारोग, सौंदर्य रोग आणि केस रोपण तज्ञ डॉ.सौ. कविता पराग गोमाशे यांचा यावेळी सत्कार करण्यात




आला. त्या एमबीबीएस.डीव्हीं असून मुंबई येथे त्यांनी राजवाडी महापालिका हॉस्पिटल तसेच काया कल्प क्लिनिक आणि हिरानंदानी हॉस्पिटल अशा विविध ठिकाणी आपली सेवा समर्पित केली आहे.पुजा खारकर, सुजाता खारोडे, चव्हाण शिक्षीका, कौलकर शिक्षीका, वंदना डोंगरदिवे, किरण इंगळे, भरारी महीला समुह, शिल्पकार महीला समुह, एड.माधुरी पवार त्या कर्तबगार महिलांचा सुद्धा महिला दिन यथोचित सत्कार करण्यात आला.

मुलींमध्ये सौंदर्य न घडवता तिची ताकद वाढवा. ती एक अबला नसून या देशाचे उज्वल भविष्य घडवणारी नारीशक्ती आहे. रूढी परंपरेने आलेल्या वारसा हक्कावर मुलींचेही तेवढेच हक्क आहेत. जर आपण जागतिक महिला दिन साजरा करत असू तर माझी महिला भगिनी स्वतः खंबीरपणे ती स्वतःची रक्षण करणारी आपण घडवली पाहिजे. मुलींच्या कर्तुत्वात जो कोणी आडवा येत असेल त्याला आडवा करण्याची ताकद माता-भगिनींनी त्यांच्यामध्ये निर्माण करण्याची जबाबदारी माता-पित्यांची म्हणजे आपली आहे असे परखड मत जिजाबाई राठोड चांदेकर यांनी मांडले. अमरावती विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या अधिष्ठाता डॉ. मोनाताई चीमोटे यांनी सुद्धा महिला स्वातंत्र्यावर आपले विचार यावेळी व्यक्त केले. ह्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्हिडिओ वॉलेंटियर्स चे प्रतिनिधी विनोद वानखडे यांनी तर आभार प्रदर्शन ऋतुजा इंगळे यांनी केले. संपूर्ण जिल्हाभरातून महिलांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती.

# महाकाली यात्रा परिसरातील व्यवस्थेची आमदार किशोर जोरगेवार यांनी केली पाहणी : विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. शाम हेडाऊ**

**चंद्रपूर :** 3 एप्रिलपासून चंद्रपूरात सुरु होणार असलेल्या चैत्र नवरात्र यात्रेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी विविध विभागाच्या अधिका-यासंसह यात्रा परिसराची पाहणी केली. ही यात्रा आपल्या जिल्ह्याच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेशी जोडलेली असून, भाविकांना आध्यात्मिक शांती आणि सुरक्षित दर्शन अनुभव मिळावा, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे असे निर्देश यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी दिले आहे.

या यावेळी मनपा आयुक्त विपिन पालिवाल, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपविभागीय अधिकारी संजय पवार, उपविभागीय पोलिस अधिकारी यादव, शहर पोलिस निरिक्षक प्रभावती ऐकुरे, वाहतूक पोलीस निरीक्षक प्रविणकुमार पाटील, तहसीलदार विजय पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अमरशेट्टीवार, शहर अभियंता विजय बोरीकर, यांच्यासह वेकीलीचे आणि महावितरण विभागाचे अधिकारी आदि अधिका-यांची उपस्थिती होती.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या सुचनांनंतर चैत्र नवरात्र यात्रेत येणा-या भाविकांच्या व्यवस्थेसाठी प्रशासन कामाला लागले आहे. या संदर्भात आमदार किशोर जोरगेवार यांनी नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयातील 20 कलमी सभागृहात बैठक घेत अधिका-यांना महत्वाच्या सुचना केल्या होत्या. तर आज त्यांनी प्रत्यक्ष यात्रा परिसराला भेट देत सर्व विभागाच्या अधिका-यांसह परिसरात करण्यात येत असलेल्या व्यवस्थेची पाहणी केली आहे.



पार्किंग व्यवस्था, यात्रा परिसराचा विस्तार, राहण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, स्वच्छता, ट्रॅफिक नियंत्रण आदी महत्त्वाच्या मुद्द्यांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली. यात्रेच्या सुव्यवस्थेसाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. श्री महाकाली माता यात्रा ही चंद्रपूर जिल्ह्यातील एक प्रमुख धार्मिक यात्रा असून, राज्यभरातून लाखो भाविक माता महाकालीच्या दर्शनासाठी येथे येतात. त्यामुळे भाविकांच्या सोयीसुविधांसाठी सुसज्ज नियोजन करणे ही आपली जबाबदारी आहे. यात्रेदरम्यान भाविकांची गैरसोय होणार नाही, गर्दीचे नियोजन योग्य प्रकारे होईल आणि सर्व सुविधांची पूर्तता होईल असे सुक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी केल्या.

यात्रेच्या काळात शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होईल. त्यामुळे भाविकांना दर्शनासाठी येताना आणि परत जाताना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी योग्य नियोजन गरजेचे आहे. वाहतूक व्यवस्था योग्य प्रकारे नियोजित केली पाहिजे. कोणत्याही प्रकारे ट्रॅफिक कोंडी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. बाहेरून येणार्या भाविकांसाठी निवास, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य सेवा या सर्व बाबींवर विशेष लक्ष दिले पाहिजे.

पिण्याच्या पाण्याची सोय पुरेशा प्रमाणात असावी. उन्हाच्या झळा वाढलेल्या असताना, भाविकांना शुद्ध आणि थंड पाणी सहज उपलब्ध होईल, यासाठी यात्रा मार्गावर आणि मंदिर परिसरात भरपूर पाण्याचे ठिकाणे असावीत. यात्रा परिसरात कचरा साचणार नाही, यासाठी नियमित साफसफाई आणि कचर्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था महापालिका आणि मंदिर प्रशासनाने उभारावी, यात्रेदरम्यान भाविकांची सुरक्षितता हा सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे. गर्दीच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त असावा, सीसीटीव्हीच्या साहाय्याने संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवले जावे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने सतर्क राहण्याच्या सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी पोलिस विभागाला केल्या आहे. व्यवसायिक आणि दुकानदारांनी देखील यात्रेच्या वेळेस शिस्तबद्ध पद्धतीने आपला व्यवसाय करावा. वीज वितरण आणि इतर महत्त्वाच्या सुविधा पुरवणार्या यंत्रणांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे. रस्ते व्यवस्थित असावेत, प्रकाशयोजना योग्य प्रकारे कार्यरत असावी आणि कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देता यावे, यासाठी सर्व स्तरांवर योग्य नियोजन असावे अशा सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे. यावेळी श्री महाकाली माता ट्रस्टचे श्याम धोपटे, अजय जयस्वाल, सुनिल महाकाले, मिलिंद गंपावार, पवन सराफ, अजय वैरागडे, सुरेश महाकुळकर, ॲड. विजय मोगरे, तुषार सोम, दशरथ सिंग ठाकुर, मनोज पाल, छबु वैरागडे, सविता दंढारे, अमोल शेंडे, करणसिंग बैस, नकुल वासमवार, सलीम शेख, कालीदास धामनगे, कार्तिक बोरेवार आदींची उपस्थिती होती.



# दूध दरात दोन रुपयांनी वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उन्हाळ्यामुळे दूध संकलनात घट झाली आहे. आईस्क्रीमसह अन्य दुग्धजन्य पदार्थांसाठी दुधाची मागणी वाढली आहे. त्यामुळे दूध दरात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाने घेतला आहे. नवी दरवाढ उद्यापासून, शनिवारपासून लागू होणार आहे. पुण्यातील कात्रज दूध संघात नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीला दूध उत्पादक आणि प्रक्रिया व्यावसायिक संघटनेचे ४७ सदस्य उपस्थित होते. या बैठकीत गाय आणि म्हशीच्या दूध दरात प्रति लिटर दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत दूध भेसळ आणि पनीर भेसळ रोखण्यावर सविस्तर चर्चा झाली. भेसळ आणि शेतकऱ्यांचे थकीत अनुदान लवकरात लवकर मिळण्यासाठी दुग्ध व्यवसाय विकास मंत्री आणि आयुक्तांना भेटण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष गोपाळराव मस्के आणि मानद सचिव प्रकाश कुतवळ आदींनी यांनी दिली.

उन्हाळ्यामुळे दूध संकलनात घट झाली आहे, दुसरीकडे दुग्धजन्य पदार्थांसाठी दुधाची मागणी वाढली आहे . उन्हाळ्यातील चारा आणि पाणीटंचाईमुळे दूध उत्पादन खर्चात वाढ झाली आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना अधिकचा भाव देण्यासाठी दूध दरवाढ करावी लागली . प्रकाश कुतवळ, सचिव, दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघ .

# आवलगाव बुद्रुकच्या विद्यार्थ्यांनी अनुभवला तारांगणाचा थरार

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अवलगाव बुद्रुक येथील विद्यार्थ्यांनी दिनांक 13 मार्च रोजी एक वेगळाच अनुभव घेतला. त्याचे असे झाले की जालना येथील प्रसिद्ध स्टील कंपनी पोलाद स्टील मार्फत विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जाणीव जागृती तसेच भौगोलिक संकल्पना स्पष्ट होण्यासाठी फिरते तारांगण हा उपक्रम अनेक दिवसांपासून चालू आहे. याच उपक्रमांतर्गत उपक्रमशील शिक्षक श्री विवेक कुलकर्णी यांनी पोलाद स्टीलच्या या उपक्रमाची दखल घेत त्यांच्याशी संपर्क साधून आवलगाव येथे देखील विद्यार्थ्यांना हे तारांगण पाहण्याची व्यवस्था केली आणि आज सर्व विद्यार्थ्यांनी आपली सूर्यमाला कशाप्रकारे दिसते? सूर्यमालेत असणारे बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ गुरु शुक्र शनि यु रेनस यासारख्या सर्व ग्रहांचे वैशिष्ट्य अक्षरशः आकाशात फिरल्यासारखे या तारांगणामध्ये बघितले. या तारांगणासाठी पोलाद स्टीलचे श्री मनगटे साहेब व श्री माने साहेब यांनी मुलाचे सहकार्य केलेविद्यार्थ्यांच्या जाणीव जागृती ह्या केवळ तोंडी शिकून पूर्ण होत नसून त्यासाठी प्रत्यक्ष देखील तितकेच महत्त्वाचे आहे आणि आज या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विज्ञान तथा भूगोल या विषयांचे प्रत्यक्ष ज्ञान घेता आले. विद्यार्थ्यांना अतिशय आनंद झाला.या उपक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक तथा ग्रामस्थ यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आज घेतलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाबद्दल उस्फुर्त अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या आलेल्या पाहुण्यांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात येऊन आभार मानण्यात आले व श्री विवेक कुलकर्णी यांनी केलेल्या उपक्रमाचे कौतुक देखील त्यांनी केले..



## डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

आधुनिक केसरी

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांना थेट इशारा दिला आहे. युक्रेनबरोबर सुरू असलेल्या युद्धादरम्यान रशियाने जर युद्धविरामाचा प्रस्ताव नाकारला तर त्यांच्यावर टोकाचे निर्बंध लादले जातील असे म्हटले आहे. आयर्लंडचे पंतप्रधान मायकल मार्टिन यांच्याशी व्हाईट हाऊस येथे भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, युक्रेनने ३० दिवसांच्या युद्धविरामाच्या कराराला संमती दर्शवल्यानंतर दुसऱ्याच दिवशी संभाव्य युद्धविरामाच्या चर्चेसाठी अमेरिकेचे अधिकारी रशिया येथे जात आहेत. मात्र ट्रम्प यांनी याबद्दल सविस्तर माहिती दिली नाही. त्यांचे विशेष राजदूत स्टीव्ह विटकॉफ हे देखील या आठवड्याच्या अखेरीस मॉस्कोला जाणार असल्याचे व्हाईट हाऊसकडून सांगण्यात आले. ट्रम्प म्हणाले की, “आम्ही रशियाशी खूप वाईट अवस्था करू शकतो. हे रशियासाठी हे खूप विनाशकारी असेल. पण मला ते करायचे नाही कारण मला शांतता हवी आहे आणि कदाचित आम्ही काहीतरी साध्य करण्याच्या जवळ पोहोचलो आहोत”. तीन वर्षांपासून सुरू असलेल्या रशिया युक्रेन-युद्धाबद्दल बोलताना ट्रम्प म्हणाले की, “सध्या आपण बोलत असताना लोक रशिया येथे जात आहेत आणि आशा आहे की, आपण रशियाकडून युद्धविराम मान्य करून घेऊ आणि जर आपण ते करू शकलो तर भीषण रक्तपात थांबवण्याकडे आपली ८० टक्के वाटचाल पूर्ण झालेली असेल. युक्रेनचे अध्यक्ष झेलन्स्की यांच्याबरोबर झालेल्या त्यांच्या विस्फोटक चर्चेच्या दोन आठवड्यानंतर ट्रम्प यांनी रशियाला हा इशारा दिला आहे. झेलेन्स्की आणि ट्रम्प यांच्यात युद्धाच्या मुद्द्यावर व्हाईट हाऊस येथे ही चर्चा झाली होती. दोन नेत्यांमधील या चर्चेनंतर ट्रम्प यामंनी युक्रेनला दिली जाणारी लष्करी मदत आणि गुप्तचर माहिती थांबवली होती. मात्र मंगळवारी युक्रेनने युद्धविराम प्रस्तावाला सहमती दिल्यानंतर ही मदत पुन्हा सुरू करण्यात आली आहे. अमेरिका आणि युक्रेनच्या अधिकाऱ्यांमध्ये सौदी अरेबिया येथे मंगळवारी चर्चा झाल्यानंतर झेलेन्स्की यांनी युद्धविरामाच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला होता. यावेळी त्यांनी अमेरिकेने रशियाला हा प्रस्ताव मान्य करायाला लावला पाहिजे असेही ते म्हणाले होते.

## मौल्यवान मित्राशी अर्थपूर्ण संवादाचे नवयुग



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**मौल्यवान मित्राशी अर्थपूर्ण संवाद घडविणारा हा दौरा त्यामुळे समान इतिहास, भूगोल आणि संस्कृतीचा सुवर्णधागा जपणारा म्हणून नव्या सागर सिद्धांताची गुंफण करणारा ठरला आहे. दहा वर्षापूर्वी मांडलेला राजकीय सिद्धांत २०२५ मध्ये प्रत्ययास आला. तो नव्या संदर्भात अधिक संयुक्तिक व अधिक औचित्यपूर्ण म्हटला पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दोन दिवसांचा मॉरिशस दौरा उभय राष्ट्रांमध्ये मैत्रीचा नवा अध्याय लिहिणारा ठरला आहे. या दौऱ्यामुळे भारताच्या अत्यंत निकटच्या आणि विश्वासू मित्रामध्ये दृढ संबंधाची बैठक अधिक मजबूत झाली आहे.**

या बेट राष्ट्राच्या ५७ व्या राष्ट्रीय दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महात्मा गांधींनी १० मार्च रोजी दांडीयात्रेस प्रारंभ केला होता. तो दिवस मॉरिशसच्या स्वातंत्र्यवीरांनी राष्ट्रीय मुक्ती दिवस म्हणून निवडला आहे. सीवूसागर रामगुलाम यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्रातून प्रेरणा घेऊन वसाहती विरुद्ध स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले होते. अशा या पवित्र राष्ट्रीय दिनी भारतीय सशस्त्र दलाची एक तुकडी नौदल आणि हवाई दलासह या प्रसंगी विशेषत्वाने उपस्थित होती. विकासाच्या सर्व पैलूंमधील ही भागीदारी उभय राष्ट्रांच्या मैत्री आणि सद्भावना वृद्धीसाठी प्रेरक व पोषक ठरणार आहे. इतिहास, भूगोल आणि संस्कृतीने हे दोन्ही देश प्राचीन काळापासून एकमेकांना जोडलेले आहेत. खोल परस्पर विश्वास आणि लोकशाही मूल्यांवरील समान श्रद्धा हा या संपर्काचा आत्मा आहे.

पंतप्रधानांच्या स्वागताला सेंट लुईस विमानतळावर २०० पेक्षा अधिक विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस या नात्याने मोदी यांनी १९९८ मध्ये मॉरिशसला रामायण महोत्सवास संबोधित करण्यासाठी विशेष भेट दिली होती. पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतल्यानंतर २०१५ साली त्यांनी मॉरिशसला भेट दिली तेव्हा त्यांनी भारत - मॉरिशस सागरी सहकार्यासंदर्भात विशेष सिद्धांत मांडला होता. १५९८ मध्ये अ‍ॅडमिरल वायब्रँड व्हॅन वॉरविक यांच्या नेतृत्वाखाली दर्यावर्दी डच खलाशी ग्रँड पोर्टवर उतरले. तेव्हा त्यांनी आपल्या सम्राटाचे मॉरिशस हे नाव या बेटाला दिले व ते पुढे रूढ झाले. या बेट राष्ट्रावर राहणाऱ्या १२ लाख लोकसंख्येपैकी ७० टक्के लोक भारतीय समुदायाचे आहेत. मूलतः ब्रिटीश आणि फ्रेंच वसाहत असलेल्या या प्रदेशात भारतीयांनी दिलेले विकासात्मक योगदान सर्वात मोठे आणि भक्कम असे आहे. त्यामुळे लोकशाही प्रक्रियेत निवडून आलेल्या नेत्यांपैकी भारतीय नेत्यांनी आपले अष्टपैलू कर्तृत्व सिद्ध केले आहे. दीर्घकाळ ब्रिटीशांच्या ताब्यात असलेले चागोस हे बंदर त्यांनी मॉरिशसला हस्तांतरीत करण्याचा निर्णय गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात घेतला. त्यावरही शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे हा दौरा म्हणजे मौल्यवान मित्रासोबत उपयुक्त संवाद साधण्याची मौलिक संधी असे म्हणता येईल. विविध क्षेत्रात सहकार्याचे नवनवीन मार्ग त्यामुळे शोधण्यात आले आहेत. हिंद महासागर क्षेत्रात सागरी संरक्षण सिद्धतेसाठी हा सिद्धांत वरदान ठरला आहे. २०१५ मध्ये मांडलेल्या व्हिजन सागर सिद्धांताचा प्रत्यय २०२५ मध्ये मूर्त स्वरुपात येत आहे. त्यामुळे या राज्यभेटीला विशेष महत्त्व आहे.

भारत-मॉरिशस दरम्यान सागरी सुरक्षा, आरोग्य सेवा, व्यापार या सर्व सहकार्याच्या विविध क्षेत्रात झालेले सामंजस्य करार एक नवे वळण देणारे आहेत. त्यामुळे या बेट राष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी भारताकडून चालना मिळत आहे. विशेषतः संरक्षण क्षेत्र, आरोग्य सेवा, लघु व मध्यम उद्योग या क्षेत्रातील विकासाला नवी झेप घेण्यासाठी प्रेरक असे वातावरण भारत तयार करीत आहे ही बाब विशेषत्वाने नोंदविली पाहिजे.

भारत आणि मॉरिशस दरम्यान आठ सामंजस्य करार झाले आहेत. त्याचा गोषवारा हा मोठा लक्षणीय आहे. पहिला करार आहे तो महासागर क्षेत्रातील शाश्वत विकासाबाबतचा. या कराराने पायाभूत विकासासाठी व्यापक चौकट प्रदान करण्यात आली आहे. सागरी संशोधन, मच्छ व्यवसाय, हरित ऊर्जा, सागर तंत्रज्ञान संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता, तज्ज्ञांची देवाणघेवाण इत्यादी पैलूंचा समावेश आहे. दुसरा सामंजस्य करार सांस्कृतिक सौहार्दावर भर देणारा असून त्यामध्ये ललित कलांचे जतन, संवर्धन, सांस्कृतिक वारसा रक्षण, पर्यटन विकास, कला, परंपरांच्याविषयी प्रदर्शनांचे आयोजन आणि विद्यार्थी आदानप्रदान इत्यादी योजनांचा समावेश आहे. तिसरा करार कृषी आणि सहकार्य या क्षेत्रातील आदानप्रदानावर भर देतो. त्यामध्ये प्रामुख्याने मॉरिशसला आंब्याची आयात भारताकडून कशी सुलभ करता येईल याचा विचार करण्यात आला आहे. चौथा करार अगालेगा या बंदराच्या विकासाचा असून त्यामध्ये तेथे हवाई व सागरी वाहतूक सुरक्षित करण्याच्यादृष्टीने पावले टाकण्यात येणार आहेत. पाचवा करार हा पारंपरिक आणि होमिओपॅथी औषधांच्या आदानप्रदानावर भर देणारा आहे. त्यामुळे उभय राष्ट्रातील पारंपरिक उपचार पद्धतींचा विकास होईल आणि आयुष मंत्रालयाकडून निर्माण केल्या जाणाऱ्या विविध आयुर्वेद उत्पादनांचा पुरवठा मॉरिशसमध्ये करण्यात येईल. अशा प्रकारचे हे सामंजस्य करार निश्चितच संबंधाला अधिक रचनात्मक दिशा देणारे आहेत. मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी आपल्या देशाचा सर्वोच्च सन्मान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना घोषित केला.

हा सन्मान मिळविणारे मोदी हे भारताचे आतापर्यंतचे पहिले पंतप्रधान ठरले आहेत. याचा अर्थ असा होतो की, मॉरिशसला पंतप्रधानांच्या अष्टपैलू नेतृत्वाची व त्यांनी घडविलेल्या राष्ट्रीय विकासातील मौलिक योगदानाची खात्री पटली आहे व त्यांनी त्याबद्दलची पावती दिली आहे. मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन प्रदान करण्याची घोषणा केली. भारत-मॉरिशस संबंध मजबूत करण्यात मोदी यांच्या योगदानाचा हा सन्मान आहे. आतापर्यंत जगातील चार नेत्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. मोदी हे त्या मालिकेत पाचवे आहेत आणि भारताचे पहिले पंतप्रधान आहेत. अध्यक्ष धरमबीर गोखूल यांना मोदी यांनी महाकुंभातील पवित्र संगमाचे पाणी पितळ आणि तांब्याच्या भांड्यात भेट दिले. अध्यक्ष महोदयांच्या पत्नीस बनारसी रेशमी साडीही भेट देण्यात आली. तेथील वनस्पती उद्यानात पूर्व राष्ट्रपती सीवूसागुर रामगुलाम यांच्या स्मृती प्रित्यर्थ वृक्षारोपण करण्यात आले. तेव्हा मोदी यांनी हरित आणि उज्वल भविष्यासाठी प्रतिक म्हणून या वृक्षाकडे पाहण्याचे आवाहन केले. मैत्रीचा हा वृक्ष आमच्या सामायिक वचनबद्धतेचे प्रतिक म्हणून उंच उंच उभा आहे असेही त्यांनी त्याचे वर्णन केले. मॉरिशसचा सर्वोच्च सन्मान प्राप्त झाल्यानंतर केलेल्या भाषणात मोदी यांनी उभय राष्ट्रातील संबंधांचे सहकार्याचे आणि नवनव्या क्षेत्रातील योगदानाचे ठोस चिंतन केले. आपल्या भाषणात त्यांनी असे सूत्र मांडले की, भारत आणि मॉरिशसमधील संबंध हे केवळ हिंद महासागरापुरतेच नव्हेत तर आपल्या सामायिक संस्कृती, इतिहास आणि मूल्यांवर आधारलेले आहेत. आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या प्रवासात आपण भागीदार आहोत. नैसर्गिक आपत्ती असो की, कोविडसारखे संकट असो यावेळी दोन्ही देशांनी परस्परांना मदतीचा हात दिला, सहकार्य केले. आता शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान कनेक्टिव्हिटी अशा अनेक नव्या क्षेत्रात विकासाचे महापर्व सुरू आहे. मेट्रो ट्रेन असो, पिण्याच्या पाण्यासाठी पाईपलाईन असो की, बेट राष्ट्रातील कनेक्टिव्हिटी आणि यूपीआय पेमेंट सुविधा असो या सर्व बाबतीत भारत थोरला भाऊ म्हणून मदतीसाठी नेहमीच हात पुढे करीत आहे. मॉरिशसमधील भारतीय समुदायासमोर मोदी यांनी केलेले भाषण म्हणजे उभय राष्ट्राच्या मैत्रीतील एक मौलिक दस्तऐवज आहे. मॉरिशसच्या लोकसंख्येपैकी ७० टक्के भारतीय आहेत व त्यामध्येही उत्तर प्रदेश व बिहार राज्यातील भोजपुरी समुदायातील लोकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे मोदी यांनी आपले भाषण हिंदी आणि भोजपुरी असे मिश्र भाषेमध्ये केले. भोजपुरी भाषेतील त्यांनी केलेल्या आव्हानामुळे त्यांच्या कर्तृत्वाचा व वक्तृत्वाचा मोठा ठसा उमटला. आमच्यादृष्टीने मॉरिशस हे एक कुटुंब आहे, अशी सुरूवात करून त्यांनी आपल्या भाषणाला क्रमाक्रमाने यशशिखरावर नेले. मॉरिशस हे आमच्यासाठी केवळ एक भागीदार राष्ट्र नाही तर ते आमच्यासाठी एक कुटुंब आहे. हे बंध इतिहास, वारसा आणि मानवी आत्म्यात रूजलेले आहेत. नवीन भारतासाठी जागतिक दक्षिणेला जोडणारा मॉरिशस हा एक महान पूल आहे.

हे नाते भारताच्या सागर दृष्टीकोनामुळे अधिक मजबूत झाले आहे. दशकापूर्वी जाहीर केलेल्या सागर दृष्टीकोनाच्या मॉरिशस केंद्रस्थानी आले आहे. आम्ही जे स्वप्न पाहिले ते खरे करून दाखविले असे मोदी यांना म्हणावयाचे आहे. आर्थिक विकासात मॉरिशसचा सहभाग महत्त्वाचा आहे. तुम्ही लोक इथे येता तेव्हा तुम्ही आपला देशही समृद्ध करीत असता असे सूत्र मांडून मोदी यांनी प्रवासी भारतीयांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले. मॉरिशसमध्ये अधिकाधिक लोकांनी गुंतवणूक करावी म्हणून त्यांना प्रोत्साहित करण्यावर मोदी यांचा भर होता. व्यवसाय करणे सोपे करण्यासाठी नोकरशाहीचे प्राबल्य टाळणे आणि लाल फितीचा प्रभाव कमी करणे महत्त्वाचे आहे असे नमूद केले. अनिवासी भारतीयांपुढे मोदी यांनी केलेले ३० मिनिटांचे भाषण मॉरिशस आणि भारत यामधील मातीचे नाते, हृदयाचे नाते व रक्ताचे नाते स्पष्ट करणारे ठरले. त्यांनी भोजपुरी भाषेत आपल्या भाषणाचा प्रारंभ केला आणि रामायणापासून ते बिहारमधील मखाना या खाद्यपदार्थापर्यंत अनेक पैलूंवर प्रकाश टाकला आणि उभय देशातील सांस्कृतिक बंध मजबूत करण्याचे आवाहन केले. त्यांचे हे भाषण लोकभाषा, लोकसंस्कृती आणि लोकसंवाद यांच्या आधारे मॉरिशसमधील लोकांच्या हृदयाच्या तारा छेडणारे ठरले असे म्हणावे लागेल.

## आधुनिक काळातील विज्ञानसूर्य : स्टीफन हॉकिंग



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आधुनिक काळातील विज्ञानसूर्य म्हणून ओळखले जाणारे प्रख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचा काल म्हणजे १४ मार्च रोजी ७ वा स्मृतिदिन होता. ७ वर्षापूर्वी १४ मार्च २०१८ रोजी त्यांचे निधन झाले. स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ जानेवारी १९४२ साली इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे झाला. त्यांचे वडील डॉ. फ्रँक हॉकिंग जीवशास्त्राचे संशोधक होते. स्टीफन हॉकिंग यांच्या जन्माच्या वेळी डॉ. फ्रँक आणि इसाबेल या दाम्पत्याने उत्तर लंडनहून ऑक्सफर्ड येथे स्थलांतर केले, कारण तेंव्हा दुसरे महायुद्ध चालू होते.**

पण काही दिवसांतच ते पुन्हा लंडनला परतले कारण त्यांचे वडील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिनमध्ये पार्सिटोलॉजी विभागाचे प्रमुख बनले होते. १९५० मध्ये हॉकिंग कुटुंबाने सेंट अल्बान्स येथे स्थलांतर केले. येथेच १९५० ते १०५३ अशी तीन वर्ष त्यांनी सेंट अल्बान्स स्कुल फॉर गर्ल्स या शाळेत शिक्षण घेतले. ही शाळा मुलींची असली तरी तिथे मुलांनाही प्रवेश दिला जात होता. स्टीफन लहानपणापासून हुशार होते. त्यांना गणित, भौतिकशास्त्र आणि संगीताची खूप आवड होती. स्टीफन हॉकिंग यांनी ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात विश्व उत्पत्ती शास्त्राचे संशोधन करण्यासाठी प्रवेश घेतला, पण अवघ्या २१ व्या वर्षी अमायो ट्रॉपिक लॅटरल स्क्लोरोसिस (एएलएस ) या असाध्य रोगाने त्यांना ग्रासले. स्टीफन हॉकिंग जेमतेम दोन वर्ष जगतील असे त्यांना सांगण्यात आले. आधी ते खूप निराश झाले पण त्याच इस्पितळातील एका रोग्याला पाहून त्यांना आशेचा किरण दिसू लागला. या आजाराने त्यांना बहुविकलांगत्व आले. चालण्याफिरण्यासाठी त्यांना व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागला. मग व्हील चेअरवर एक संगणक जोडण्यात आला. फक्त एक बोट वापरुन ते संगणकावर काम करू लागले. १९८५ साली त्यांना न्यूमोनिया झाला. त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली या शस्त्रक्रियेनंतर त्यांचा आवाजही गेला पण त्यांनी हार मानली नाही. दुर्दम्य इच्छाशक्ती, सकारात्मकता, कार्यमग्नता आणि जीवनाविषयीचे प्रेम या गुणांच्या जोरावर त्यांनी दुर्धर आजारावर मात करीत कृष्णविवरासंदर्भात अनेक संशोधन करुन जगाला अचंबित केले. कृष्णविवरासंदर्भात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या ब्रिफ हिस्ट्री ऑफ टाईम या पुस्तकाने



अनेक विक्रम केले. या पुस्तकावर आधारित अनेक मालिका व चित्रपट निघाले. रॉजर पेनरोज या सहकाऱ्याच्या मदतीने त्यांनी सापेक्षतेवादाच्या सिद्धांतावर आधारित अवकाश व काळाची सुरवात बिगबँगमध्ये झाली असेल तर कृष्णविवरात शेवट असेल असा सिद्धांत मांडला. कृष्णविवरे काळी नसतात. कृष्णविवरे उत्सर्जन करतात. ब्रह्मांडाला कोणतीही सीमा नाही असे सिद्धांत त्यांनी मांडले. त्यांची अनेक संशोधने ही काळाच्या पुढची होती. म्हणून त्यांना आधुनिक काळातील न्यूटन असे म्हणतात. स्टीफन हॉकिंग यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी व स्तिमित करणारे आहे. काळाच्या पुढे असणारा हा शास्त्रज्ञ आधुनिक काळात होऊन गेला, ही गोष्टच पुढील पिढीला स्तिमित करणारी ठरेल. स्टीफन हॉकिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नाथषष्ठी निमित्ताने पैठणमध्ये पोलीसांचा आढावा

## यंदाच्या नाथषष्ठीला राज्यभरातून सुमारे दहालक्ष भविकभक्त येण्याचा अंदाज

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** सहा दिवसावर येवुन ठेपलेल्या संत एकनाथ महाराज षष्ठी यात्रा महोत्सवासाठी लागणाऱ्या पोलीस बंदोबस्ताचा तसेच नाथ मंदिर परिसरात अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग यांनी आढावा घेतला.
बाहेरील नाथ समाधी मंदीर, गावातील नाथमंदिर, दिंडी मार्ग, काल्याचा कार्यक्रम, दहीहंडी कार्यक्रम, छबीना मिरवणूक, वारकरी यांचे थांबण्याचे ठिकाण, पार्किंग, नवीन बस स्थानक, वाहना ची पार्किंग व्यवस्था, मालवाहतुकीचे मार्ग, पाणी पुरवठा, इत्यादी ठिकाणा ची पाहणी, अडचणी व त्या वरील उपाय योजना, इत्यादी बाबत मा तहसीलदार, मुख्यधिकारी, MSEB, व्यापारी, नाथ वंशजयांच्या सह बैठक घेण्यात आली.
२० मार्चपासून सुरू होणाऱ्या संत एकनाथ षष्ठी महोत्सवाला राज्य भरातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या सुरक्षितेसाठी पोलीस बंदोबस्त तसेच भाविकांची गैरसोय कशी टाळण्यात येईल. या विषय नाथ संस्थानचे कार्यकारी विस्वस्त बाजीराव बारे यांच्याशी चर्चा करण्यात आली. पोलिसांच्या वतीने आज दोन्ही नाथ मंदीर तसेच यात्रा मैदान भागात पोलीस बंदोबस्त, पोलीस मदत कक्ष सीसीटीव्ही कक्ष, सीसीटीव्ही मनोरे, पोलीस चेक पॉईंट, महिला मदत कक्ष तसेच शहरात येणाऱ्या सर्व प्रमुख रस्त्यावर चेक पॉईंट आदी ठिकाणच्या जागेची पाहणी करण्यात आली. यंदाच्या नाथषष्ठीला राज्यभरातून सुमारे दहालक्ष भविकभक्त येण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.
यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे पोलीस निरीक्षक पोलीस संजय देशमुख,जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक किशोर पवार व गोपनीय अंमलदार मनोज वैद्य, ज्ञानेश्वर दराडे यांनी भाविकांचे सोय गैरसोय बाबत पाहणी करण्यात आली.



# बोडखा येथे ग्राम दरबार उपक्रमाचे आयोजन



आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**
**खुलताबाद :** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र बाजार सावंगी अंतर्गत उपकेंद्र बोडखा येथे मा विभागीय आयुक्त यांच्या संकल्पनेतून एक दिवस गावकऱ्यांसाठी ग्राम दरबार उपक्रम कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रमाचे अध्यक्ष मा प्रकाश नाईक गट विकास अधिकारी व तालुका अधिकारी डॉ समाधान राऊत यांच्या मार्गदर्शनानुसार घेण्यात आला सदर काम मध्ये बोडखा येथील उपस्थिती गावकऱ्यापैकी 98 नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली व 16 जणांची रक्त नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले कार्यक्रमास आरोग्य विभागाचे अधिकारी डॉ अंजुम निलोफर व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# शिल्पनिदेशक पदावर रविंद्र केणे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**कुडूत्री :** व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र



राज्य यांच्यामार्फत सप्टेंबर २०२२ मध्ये अर्ज स्विकारण्यात आले होते. जानेवारी २०२३ मध्ये पूर्व परीक्षा घेण्यात आली. मुख्य परीक्षा जून २०२३ मध्ये घेण्यात आली. दोन्ही परीक्षांचा एकत्रित निकाल मार्च २०२५ मध्ये आला. या परीक्षेमधून श्री. रविंद्र दिलीप केणे, रा. व्हणगुत्ती (श्रीनगर) यांची फिटर (जोडारी) या विषयासाठी शिल्पनिदेशक ( शिक्षक) पदावर निवड झाली. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. चार महिन्यांपूर्वी म्हणजेच ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांची शासकीय टेक्निकल हायस्कूल ठाणे येथे निदेशक- पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (मेकॅनिकल टेक्नॉलॉजी) या पदावर नियुक्ती झाली होती. त्यांनी फक्त चार महिन्यांतच परत एकदा सलग दुसरी शासकीय पोस्ट मिळवत यशाला गवसणी घातली. त्यांच्या या नियुक्तिने खेडेगावातील विद्यार्थीसुद्धा कोणतीही शिकवणी न घेता स्वतः अभ्यास जिद्द चिकाटी ठेवून कष्ट केल्यास उच्च पदावर पोहचू शकतो हे दाखवून दिले आहे आणि परत एकदा शासकीय क्षेत्रात आपले नाव कोरले आहे.

# विश्वशांती बुद्ध विहार जवळा येथे फाल्गुन पौर्णिमा उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** नांदेड दक्षिण मतदार संघातील तसेच लोहा तालुक्यातील सोनखेड सर्कल अंतर्गत येत असलेल्या जवळा देशमुख येथील विश्वशांती बुद्ध विहार या ठिकाणी फाल्गुन पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा तथा तालुका पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थित होती.

सविस्तर वृत्त असे की विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी मागील पाच वर्षापासून प्रत्येक पौर्णिमा अतिशय हर्ष उल्हास मध्ये साजरी करण्यात येत असते प्रत्येक पौर्णिमा ही सामुदायिक न करता एका घराला एक पौर्णिमा संयोजक याप्रमाणे अविरतपणे सुरू आहे. या वेळचे संयोजक उपा रमाबाई रोहिदास गोडबोले आणि उपा सारिका अरविंद गोडबोले यांच्या परिवाराकडून साजरी करण्यात आली यावेळी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा सरचिटणीस रत्नाकर महाबळे, सचिव आनंद पुरभाजी गोडबोले, जिल्हा संघटक लोहा तालुका प्रभारी सुभाष खाडे, लोहा तालुका अध्यक्ष बापुसाहेब कापुरे, लोहा सरचिटणीस तथा केंद्रीय शिक्षक धोंडिबा यानभुरे, लोहा तालुका संरक्षण सचिव तुकाराम खिल्लारे, लोहा तालुका संघटक रमेश गोडबोले, व समता सैनिक दलाचे सैनिक गुणवंत गच्चे, रवीकांत गच्चे, ऐहलाजी गोडबोले, केशव गोडबोले, सुरेश गोडबोले यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला.

सर्वप्रथम महाकारुणिक तथागत गौतम बुद्ध आणि परमपुज्य बौध्दीसत्व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिप व धुप पुजा पाहुणे यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर संयोजक उपा रमाबाई रोहिदास गोडबोले आणि उपा सारिका अरविंद गोडबोले यांच्या परिवाराने सामुदायिक वंदना घेताना पुजेचा मान मिळविला. यावेळी केंद्रीय शिक्षक यानभुरे यांनी सर्व श्रद्धावान बौद्ध उपासक उपासिका व बालक बालिका यांना गोडबोले परिवारासह पवित्र असं परित्राण दिले. त्यानंतर फाल्गुन पौर्णिमेविषयी माहिती सांगितली.आणि या पौर्णिमेला बुद्ध कपिल वस्तू या जन्मगावी बुद्धत्व प्राप्तीनंतर भेट दिली. व येथे गेले असता बुद्धानी चारिका करुन बुद्धत्व पाळले.तर राजा शुध्दोधन यांनी भोजनदान देवुन राजस्व पाळले. अशी माहिती उपासक उपासिका यांना देण्यात आली.

त्यानंतर आशिर्वाद गाथेने सर्वाप्रती मंगल कामना व्यक्त केल्या. समता सैनिक दलाच्या जवानांचा सन्मान रोहिदास गोडबोले यांच्या परिवाराकडुन करण्यात आला.यावेळी भिमराव गोडबोले, कैलास गोडबोले, पुरभाजी गोडबोले, पांडुरंग गच्चे, मिलिंद गोडबोले, वसंत गोडबोले, बाबुराव गोडबोले, मुकुंद गोडबोले, यांच्यासह गावातील श्रध्दावान बौद्ध उपासक उपासिका व बालक बालिका आणि पाहुणे मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. त्यानंतर भोजनदान खिरदान सर्व श्रद्धावान उपासक उपासिका यांना केले.

# ॲड. अवलोकिता माने यांना स्वयंसिद्धा राष्ट्रीय पुरस्कार नुकताच प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया पुणे शाखेच्या अध्यक्षा ॲड. अवलोकिता माने यांना नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने प्रतिष्ठित असा 'स्वयंसिद्धा राष्ट्रीय पुरस्कार' नुकताच प्रदान करण्यात आला. ॲड. अवलोकिता माने कायदेतज्ज्ञ व कलाकार असून, 'निवांत अंधमुक्त' संस्थेसाठी, कॅन्सरग्रस्त, अपंग व विशेष मुलांसाठी, पर्यावरण, स्त्रियांचे लैंगिक आरोग्य व हक्क, सर्वांसाठी कायद्याच्या चौकटीतील समुपदेशन, दिव्यांग महिलांसाठी, तसेच रांगोळी व साक्षरतेच्या संदेशातून सामाजिक प्रबोधन करण्याचे काम त्या करीत आहेत.

ॲड. माने २०१८ पासून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया पुणे शाखेच्या अध्यक्षा आहेत. त्यांच्या क्लिनिकमध्ये माफक दरात गरजूंसाठी वैद्यकीय सेवा पुरवली जाते. या कालावधीत महिलांसाठी सर्व प्रकारचे सहाय्य, तसेच एचआयव्ही रुग्णांचे आरोग्य व अर्थार्जन, ट्रान्सजेंडर समुदायाच्या मूलभूत हक्कांसाठी त्या कार्यरत आहेत. रोटरी क्लबच्या माजी अध्यक्षा म्हणूनही त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. सध्या रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ व फॅमिली प्लॅनिंगच्या संयुक्त संकल्पनेतून भारताला ॲनिमिया मुक्त करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'द चेरी ब्लॉसम प्रोजेक्ट'च्या त्या प्रमुख मार्गदर्शक आहेत. माने यांनी या पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, अतिशय निस्पृह व निरपेक्षपणे केलेल्या कार्याचा गौरव माझ्या एकटीचा नसून, मला आजवर ज्यांनी ज्यांनी पाठिंबा दिला, मला सहकार्य केले, त्यांचाही हा सन्मान आहे. त्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करते. हा पुरस्कार माझे आईवडील, सासूसासरे यांना समर्पित करते.




शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# मध्ययुगीन साहित्यातील संत विचाराने शस्त्र बोथट करून समाज परिवर्तन घडवून आणले

## महंत बा. भो. बाभुळगावकर शास्त्री : पैठणच्या प्रतिष्ठान महाविद्यालयात मराठी राष्ट्रीय परिषद उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मध्ययुगीन काळात संतांनी वचन, लीळा व अभंगाच्या माध्यमातून तत्कालीन समाजात स्नेह निर्माण केला. तत्कालीन परिस्थितीमध्ये नागदेवाचार्यादी संत विभुतींनी जाणीवपूर्वक लोकभाषेचा स्वीकार करून आपल्या विचारातून, विपूल साहित्यनिर्मितीतून समाजात स्नेह, प्रेमभाव निर्माण करीत शस्त्राची धार बोथट करून समाजपरिवर्तन घडवून आणले, असे मत महंत बा. भो. बाभुळगावकर शास्त्री यांनी व्यक्त केले. ते पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयात मराठी राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटक म्हणून बोलत होते. या प्रसंगी उदघाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. माधव सोनटक्के, बीजभाषक प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. देवकर्ण मदन तर प्रा. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप, व्यवस्थापन परिषद सदस्या डॉ. योगिता तौर-होके, डॉ. व्यंकटेश लांब, डॉ. अपर्णा पाटील, प्राचार्य नवनाथ आघाव आदी उपस्थित होते. पुढे बोलतांना शास्त्री म्हणाले की, मध्ययुगीन काळात समाज एकसंघ करून चक्रधरस्वामीनी अभयदान तर संत ज्ञानेश्वरांनी समाजासाठी पसायदान मागीतले. स्नेह, प्रीती, प्रेम व उत्कट भक्तीच्या माध्यमातून सर्व जाती धर्मातील लोकांना जोडण्याचे कार्य संतमंहतांनी केले. म्हणून ते विचार आज प्रासंगिक ठरतात.



बीजभाषणातून डॉ. देवकर्ण मदन यांनी वर्तमानकालीन संशोधन हा चिंतेचा आणि चिंतनाचा विषय झाला असून संशोधनासाठी आवश्यक ते मापदंड आणि निकष यांच्या आधार घेणे आवश्यक आहे, असे सांगून त्यांनी संशोधनाच्या संदर्भात मध्ययुगीन साहित्यातील मूल्ये आणि मापदंड याच्या विचारासह संशोधनाच्या माध्यमातून साहित्य आणि समाज यांचा समन्वय साधला गेला पाहिजे. माणसाला जोडणाऱ्या साहित्याची आज आवश्यकता असून मध्ययुगीन साहित्यातील सर्वच मानवीमूल्ये आज संशोधनातून स्वीकारली जावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी डॉ. गजानन सानप व डॉ.योगिता तौर-होके यांनी ही आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. माधव सोनटक्के यांनी 'वर्तमानकालीन अध्ययन, अध्यापन, संशोधन, तत्सम चर्चासत्रे व परिषदांसंदर्भात असणाऱ्या गंभीर परिस्थितीविषयी चिंता व्यक्त करून संशोधन कार्यात समीक्षा व मूल्यांकनाचे निकष महत्त्वाचे असून त्या अनुषंगाने शिक्षणव्यवस्थेत बदल होणे अपेक्षित आहे, असे मत मांडले. तत्पूर्वी संयोजक प्रा. सर्जेराव जिगे यांनी परिषद घेण्यामागील भूमिका मांडली.

डॉ. राम रौनेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'आधुनिक व मध्ययुगीन मराठी 'साहित्य, संशोधन आणि वर्तमान' या विषयासंदर्भातील सत्रात डॉ अनिता खंडागळे, डॉ. तुषार चांदवडकर, डॉ. माधव कदम, डॉ. राजश्री पवार या मान्यवरांनी आपले मौलिक विचार मांडले. डॉ.ज्योती स्वामी, डॉ.पंडित रानमाळ, डॉ. रमेश औताडे यांनी डॉ, सोपान सुरवसे यांच्या प्रमुख उपस्थितीत शोधनिबंध वाचन केले. प्राचार्य मजहर फारुकी यांच्या अध्यक्षतेखाली समारोपीय सत्र संपन्न झाले. या परिषदेप्रसंगी डॉ. अरविंद केंद्रे, प्राचार्य एस. जी. सोनकांबळे, डॉ. युवराज धबडगे, डॉ. नंदकिशोर चौधरी, आदींची उपस्थिती होती. उदघाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. हंसराज जाधव यांनी केले. तर आभार डॉ. शेख माजिद यांनी मानले. मोठ्या संख्येने उपस्थिती आसलेल्या सहभागी प्राध्यापक, संशोधक, अभ्यासकांचे आभार प्रा. सर्जेराव जिगे यांनी मांडले.



# मालमोटारीला मुंबई-अमरावती एक्स्प्रेसची धडक

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यातील बोदवड स्थानकालगतचे बंद फाटक तोडून थेट रेल्वे मार्गावर आलेल्या मालमोटारीला मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस ते अमरावती एक्स्प्रेस धडकल्याची घटना शुक्रवारी पहाटे पाचला घटली. सुदैवाने रेल्वे गाडीचा वेग कमी असल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र अपघातामुळे भुसावळ-नागपूर-हावडा मार्गावरील वाहतूक सकाळपासून ठप्प झाली होती.

बोदवड रेल्वे स्थानकापासून साधारण ५०० मीटर अंतरावर असलेले फाटक उड्डाणपूल उभारण्यात आल्यापासून वापरासाठी बंद केले आहे. त्याबाबत अनभिज्ञ असलेल्या चालकाने त्याच्या ताब्यातील मालमोटार त्या रस्त्याने भरधाव आणली. फाटक बंद असल्याचे अचानक लक्षात आल्यावर त्याने वेगावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्नही केला. मात्र, भरधाव मालमोटार तोपर्यंत फाटक तोडून थेट रेल्वे मार्गावर गेली होती. याच दरम्यान, मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनसहून अमरावतीकडे जाणारी एक्स्प्रेस बोदवड स्थानकावरून नुकतीच मार्गस्थ झालेली होती. त्यामुळे रेल्वे गाडीचा वेग बऱ्यापैकी कमी होता. त्यामुळे एक्स्प्रेसला थांबवण्यात चालकाला लगेच यश आले. तरीही एक्स्प्रेसचे इंजिन धडकल्याने रेल्वेमार्गावर उभ्या असलेल्या मालमोटारीचा चुराडा झाला. त्यातील गव्हाचे पोते सगळीकडे विखुरले गेले. अचानक ब्रेक दाबण्यात आल्याने एक्स्प्रेसमध्ये झोपलेले अनेक प्रवासी बर्थवरून खाली पडले. अपघात घडल्यानंतर मोटारीचा चालक अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाला. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, बोदवड स्थानकावरील अपघातामुळे मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली असून, ती सुरळीत करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. जेसीबीच्या साहाय्याने अपघातग्रस्त मालमोटारीसह त्यातील गव्हाचे पोते हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट

## गडचिरोली माईनिंग हब, नागपूर विमानतळ आदींबाबत सकारात्मक चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे भेट घेत, त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. राज्य सरकारने गडचिरोलीत पोलाद क्षेत्रात मोठा पुढाकार घेतला असून, गडचिरोली आता देशाची स्टीलसिटी म्हणून विकसित होत आहे. यादृष्टीने गडचिरोलीला माईनिंग हब म्हणून विकसित करण्यासाठी केंद्राने सहकार्य करावे, असे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. नागपूर विमानतळाच्या कामाला सुद्धा गती देण्यात आली असून, त्यात केंद्र सरकारसंदर्भातील काही विषयांबाबत सुद्धा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी चर्चा केली. यामुळे विमानतळ कामातील अडसर आता लवकरच दूर होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांना 15 व्या वित्त आयोगाचा निधी लवकरात लवकर मिळावा, असाही एक



विषय या चर्चेत होता. या सर्व बाबतीत सकारात्मक प्रतिसाद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला.

वर्ल्ड ऑडिओ, व्हीज्युअल अँड एन्टरटेंटमेंट समिट आयोजित करण्याची संधी महाराष्ट्राला दिल्याबद्दल या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. 1 ते 4 मे या कालावधीत मुंबईत ही समिट होणार आहे. याचनिमित्ताने मुंबईत आयआयटीच्या धर्तीवर आयआयसीटी (इंडियन इन्स्टिट्युट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी) सुद्धा स्थापन करण्यात येणार असून, त्यासाठी सुद्धा केंद्र सरकार निधी देणार आहे, त्याबद्दलही मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.





# डॉ. माधवी खोडे चवरे यांनी स्वीकारला कुलगुरूपदाचा प्रभार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा प्रभार अपर विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे चवरे यांनी गुरुवार, दि. १३ मार्च २०२५ रोजी स्वीकारला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील कुलगुरू कक्षात प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्याकडून डॉ. माधवी खोडे चवरे यांनी कुलगुरू पदाचा प्रभार स्वीकारला. कुलगुरू पदाचा प्रभार स्वीकारल्यानंतर डॉ. माधवी खोडे चवरे यांनी वेळेवर परीक्षा घेत तातडीने निकाल घोषित केले जाणार असल्याची माहिती दिली. उन्हाळी २०२५ दरम्यान एक हजार पेक्षा अधिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या जाणार असून याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. विद्यापीठाचे प्रशासकीय कार्य विद्यार्थी केंद्रित असावे, अशा देखील त्या म्हणाल्या. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव विज्ञान विद्याशाखा डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, राज्यपालनामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, श्री अजय चव्हाण, प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, आयआयएल संचालक डॉ. निशिकांत राऊत यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

# माजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याला अखेर यश; पीक विमा मंजूर

## माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी मानले आभार

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात व सिल्लोड



परिसरात पीक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याची गंभीर बाब माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांच्या समोर आली आहे. यावरुन अधिकाऱ्यांना व पिक कंपनीला खडसावत पीक विमा योजनेची रक्कम तत्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात टाकण्यात यावी, अशी सूचना देऊन यावर्षीचा खरीपाचा २०२४ पिक विमा आमदार अब्दुल सत्तार यांनी शासन दरबारी भांडून सिल्लोड सोयगाव तालुक्याचा पिक विमा मंजूर करुन घेतला या बद्दल सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी मानले माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांचे आभार मानले आहेत.सोयगाव सिल्लोड तालुक्यात अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं कंबरडं मोडलंय. त्यामुळं पंचनामे करुन शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई देणं गरजेचं होतं.मात्र, पीक विमा कंपनीकडून ज्यांच्या पिकांचं नुकसान झालं, त्याची नोंदच करण्यात आली नाही. तर ज्यांची नोंद झाली त्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचं माजी पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या निदर्शनास आले होते. त्यांनी यावरुन अधिकाऱ्यांना चांगलंच धारेवर धरलं. नुकसान भरपाईची रक्कम तत्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात टाकण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. शेतकऱ्यांच्या खात्यावर पिक विमा पैसे येण्यास सुरुवात झाली आहे शेतपिकांचं नुकसान झाल्यास त्यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीनं प्रधानमंत्री पीक विमा योजना ही महत्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली. ही जबाबदारी काही खासगी कंपन्यांना देण्यात आली आहे.
छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील  पीक विमा काढण्याचं काम हे 'ओरिएंटल इन्शुरन्स' या कंपनीला देण्यात आलं. या वर्षी अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टी यामुळं जिल्ह्यातील सिल्लोड सोयगाव भागात शेतमालाचं अतोनात नुकसान झालं. यात कापूस आणि सोयाबीनचं प्रमाण सर्वाधिक आहे. यावेळी पीक विमा कंपनीनं पंचनामा करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणं आवश्यक होते.शेतकऱ्यांनी पीक विम्याच्या संदर्भात दावा दाखल केला. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेला कंपनीनं वाटाण्याच्या अक्षता दाखवली होती परंतु आमदार अब्दुल सत्तार यांनी पाठपुरावा करून अखेर पिक विमा मंजूर करून घेतला आणि शेतकऱ्यांना मिळाल्याने सभापती धरमसिंग चव्हाण नांदा तांडा यांनी आमदार अब्दुल सत्तार यांचे आभार मानले.

# कुष्ठरोग जनजागृतीसाठी 16 मार्च रोजी आंनदवनात रन फॉर लेप्रसीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सन 2027 पर्यंत कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्याकरीता चंद्रपूर जिल्हयात  स्पर्श -2025 अंतर्गत कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. यात विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) चंद्रपूर, तालुका  आरोग्य अधिकारी, वरोरा व महारोगी  सेवा  समिती संचालीत आनंद निकेतन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने 'रन फॉर लेप्रसी' मॅराथॅानचे आयोजन 16 मार्च 2025 ला सकाळी 7 वाजता आनंदनिकेतन महाविद्यालय, आनंदवन येथे करण्यात आलेले आहे. स्पर्धकांनी सकाळी 6.30 वाजता मॅराथॅान  ठिकाणी उपस्थित राहावे.

या मॅराथॅान स्पर्धेत 15 वर्षावरील सर्व मुला- मुलींना सहभाग घेता येणार असून माध्यमिक शाळा व महाविद्यालयाचे विद्यार्थी, सर्व सामान्य नागरीक, कुष्ठरोगाबाबत कार्य करणाऱ्या स्वयंसेवा संस्था, शासनाचे विविध विभाग, डॉक्टर संघटना, पुरस्कार प्राप्त खेळाडु, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती यांचाही समावेश राहणार आहे.

सदर मॅराथॅान करीता FREE REGISTRATION SCANNER उपलब्ध KARUN देण्यात आले आहे. त्याद्वारे विनामुल्य नोंदणी करायची आहे. स्पर्श कुष्ठरोग अभियाना अंतर्गत या वर्षीचे घोषवाक्य "कुष्ठरोगाबाबत एकत्रितपणे जनजागृती वृध्दींगत करु, त्याबाबतचा गैरसमज दूर करू व कुष्ठरोगाने बाधित एकही व्यक्ती राहणार नाही याची दक्षता घेऊ या उपक्रमात नागरीकांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन  जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोले,  जिल्हा आरोग्य  अधिकारी डॉ. अशोक कटारे , महारोगी सेवा समिती आंनदवनचे सचिव डॉ. विकास आमटे, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) चंद्रपूरचे डॉ. संदीप गेडाम यांनी केले आहे.



# सावळदबारा परिसरात धुळवड उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे परिसरात व गावात होळी हा सण म्हणजे अग्नीला कृतज्ञतापूर्वक केलेला प्रणाम. पालापाचोळ्याचा नायनाट करून स्वच्छता करण्यासाठी होळी सण साजरा केला जातो. सावळदबारा ग्रामीण भागात प्रत्येक गाव-पाड्यात २०२५ मार्च गुरुवार रोजी रात्री हा उत्सव जल्लोषात साजरा करून पूजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणेच सावळदबारा परिसरात यंदा धुळवड मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी पारंपरिक पद्धतीने होळीचे पूजनही विधिवत करण्यात आले; तर पर्यावरणाचा जागर करत रंगपंचमीला पाण्याचा वापरही कमी प्रमाणात झाल्याचे दिसून आले. परिसरात ठिकठिकाणी बच्चे कंपनीचा जल्लोष मोठ्या प्रमाणात होता. त्याचबरोबर नैसर्गिक रंगाने होळीचा मनसोक्तपणे आनंद लुटतानादेखील रासायनिक रंगांना नागरिकांकडून बगल देण्यात आली. चक्रधर स्वामी मंदिराजवळ गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेला होळी सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या वेळी तरुणाईच्या आनंदाला उधाण आले होते. होळीच्या दिवशी नवविवाहित मानाचे जोडेही उपस्थित होते. त्यांनी विधिवत होळीभोवती प्रदक्षिणा घातली व होळी मातेकडे पुढील वैवाहिक आयुष्य सुखा-समाधानात जावे म्हणून साकडे घातले. होळीचा आनंद घेत असल्याचे दिसून आले. पुजारी, शिंदे, कोलते पाटील, सुर्यवंशी,बुढाळ,गायकवाड, राजपूत बांधवांनी नटून-थटून कोळी बँडच्या तालावर पारंपरिक नृत्य केले. पारंपरिक पद्धतीने मनोरा रचून होळीची विधिवत पूजा करण्यात आली. होळी सणानिमित्त बालगोपाल यांची गर्दी पाहावयास मिळाली.
या वेळी बिट जमादार मिरखा तडवी, शिवदास गोपाळ पोलिसांकडून नागरिकांच्या सुरक्षेसाठी दक्षता घेण्यात आली होती.नृत्याचा मनमुराद आनंद गृहसंकुलांत राहणाऱ्या नागरिकांनी एकत्र येत रंगपंचमीचा आनंद लुटला. या वेळी त्यांनी होळी गीतावर मनमुराद नृत्य केले. मित्र मंडळी व ग्रामस्थांनी गावागावांत होळीनिमित्त रंगांची उधळण केली. काही ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# सव्वा तीन हजार ग्राहकांवर कारवाईची 'वीज'

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** वीज वापर करून त्याचे देयक भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या अकोला परिमंडळातील सव्वा तीन हजारावर ग्राहकांवर कारवाईची 'वीज' कोसळली आहे. थकबाकीदार ग्राहकांची 'बत्तीगुल' केली. २६४ कोटी रुपयांच्या थकबाकी वसुलीसाठी महावितरणचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. देयक भरण्यासाठी प्रतिसाद न देणाऱ्या परिमंडळातील तीन हजार २८३ वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित केला. संपूर्ण थकबाकी आणि पुनर्जोडणी शुल्क भरल्याशिवाय ग्राहकांचा वीज पुरवठा पूर्ववत केला जाणार नसल्याची आक्रमक भूमिका महावितरणने घेतली.

# टंचाईवर जलस्त्रोतांचे पुनर्रजीवनाचा पर्याय

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** जिल्ह्यातील काटोल, नरखेड तालुक्यात व इतर ठिकाणी  दरवर्षी काही गावांना पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. इतर तालुक्यात जी लहान मोठी नदी, नाले, ओहोळ आहेत ती पावसाने काठोकाठ वाहिल्यामुळे पुराचा प्रश्न उद्‌भवून  मोठ्या प्रमाणात जमीनीची धूप होते. पाणी टंचाई  आणि अतिवृष्ठीमुळे निर्माण होणाऱ्या संकटाचा सामना करण्याची वेळ येऊ नये यादृष्टीने जलसंधारणाची कामे करणे आवश्यक असून जिल्ह्यातील किमान दीड हजार जलस्त्रोतांचे पुनर्रजीवन करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. नागपूर जिल्ह्यात सुमारे ४ हजार ५०० च्या आसपास लहान मोठे बंधारे, जलस्त्रोत आहेत. यातील अनेक लहान जलस्त्रोत पावसाच्या गाळाने भरले असून लहान नदी नाल्यातील हा गाळ काढणे आवश्यक आहे. शासनाने उभारलेल्या या जलसंसाधनांद्वारे मोठ्या प्रमाणात जलसंचय उपलब्ध होऊ शकतो.



# वनविभागामुळे बिबट माता-पिल्लाच्या भेटीने कर्मचारी झाले भावूक

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** नांदुरा तालुक्यातील जवळा बाजार परिसरात बिबट माता आणि तिच्या पिल्लाची ताटातूट झाली. वियोगामुळे माता कासावीस, अस्वस्थ झाली तर दिडेक महिन्याचे शावक भयभीत झाले होते. दुसरीकडे जवळा बाजारमधील गावकरी आणि शेतकरी भयभीत झाले होते मात्र वनविभागाने अखेर माता आणि तिच्या लेकराची भेट घडवून आणली. त्यांच्या पुनःभेटीने वनविभाग पथकातील कर्मचाऱ्यांना देखील गहिवरून आले. बिबट मातेने लहानग्या पिल्लाला तोंडात धरून



सोबत नेत असताना कर्मचाऱ्यांचे डोळेही पानावले. बुलढाणा जिल्ह्यातील जवळा बाजार गावा नजिकच्या असलेल्या एका मकाच्या शेतात बिबट्याचा एक ते दिड महिन्याचा शावक आढळून आला होता. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या मनात भीतीचे वातावरण पसरले होते. आपल्या आईपासून दुरावलेल्या या पिल्लूला आई पुन्हा मिळावी यासाठी वन विभागाने प्रयत्न केले. अर्ध्या रात्री दोघाची पुनर्भेट झाली. ही भेट परिसरात लावण्यात आलेल्या 'ट्रॅप कॅमेऱ्या'त कैद झाली आहे. नांदुरा तालुक्यातील जवळा बाजार येथील शेतकरी सुनील उखर्डा ढोकने यांचे गावाजवळ शेत आहे. सुनील ढोकने तीन दिवसापूर्वी सकाळी शेतात काही कामानिमित्त गेले होते. यावेळी त्यांना शेतातील मका पिकात बिबट्याचा एक ते दिड महिन्याचा शावक दिसून आला होता. मादी बिबट जवळच असेल अशी शंका होती. ही बातमी गावात पसरताच गावकरी आणि इतर शेतकरी भयभीत झाले. यामुळे भयभीत झालेले शेतकरी सुनील ढोकने यांनी तात्काळ मोताळा वनविभागाला याची माहिती दिली. याची गनभीर दखल घेत वन परिक्षेत्र अधिकारी किशोर पडोळ यांच्या मार्गदर्शनात वनपाल ए.एन. सपकाळ, वनरक्षक एल.डी. राठोड, चालक वैभव फुंड व काही वन मजूर घटनास्थळी पोहोचले. बिबट्याच्या शावकाला ताब्यात घेऊन परिसरात शोध घेतला. मात्र मादी बिबट् आढळून आली नाही. यामुळे या पिल्लूला मोताळा येथे आणून त्याची पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करण्यात आली. वैद्यकीय तपासणीत हे पिल्लू सुदृढ असल्याचे सांगण्यात आले. बुलढाणा उप वनसंरक्षक सरोज गवस, सहायक उप वन संरक्षक अश्विनी आपेट यांच्या निर्देशानुसार पुढील कारवाई करण्यात आली. वन परिक्षेत्र अधिकारी किशोर पडोळ यांनी बिबट माता व पिल्लुचे मिलन व्हावे यासाठी जवळा बाजार येथील शेतकरी सुनील ढोकणे यांच्या शेतात काल सायंकाळी पोहोचले. शावकाला प्लास्टिकच्या कॅरेट मध्ये सुरक्षित ठेवण्यात आले तसेच आजूबाजू ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले. अधिकारी व कर्मचारी घटनास्थळा पासून लांब अंतरावर निघून गेले. दरम्यान काल मध्यरात्री शावकाचा आवाज ऐकून त्याची आई कॅरेटजवळ पोहोचली. आपल्या शावकाला तोंडात धरून निघून गेली.




# मुखेडात 'बायोमेट्रिक'चा बोजवारा; यंत्रणा सक्तीची करा : काँग्रेस पक्षाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक मशीनचा बोजवारा उडाला असून अधिकारी व कर्मचारी सातत्याने गैरहजर असल्याने अनेक खेट्यानंतरही नागरिकांचे प्रश्न सुटत नाहीत. तहसीलदारांनी सर्व शासकीय कार्यालयात स्वयंचलित हजेरी यंत्र अर्थात बायोमेट्रिक पद्धत तपासून सक्तीची करण्यात यावी अशी मागणी काँग्रेस पक्षाकडून तहसीलदारांना करण्यात आली आहे.

काँग्रेस प्रदेश सचिव डॉ.श्रावण रॅपणवाड यांच्या नेतृत्वात काँग्रेसचे शिष्ट मंडळ तहसीलदारांना भेटून तालुक्यातील समस्यांबाबत चर्चा करून निवेदन दिले. नुकतेच पंचायत समिती कार्यालयात सामाजिक कार्यकर्त्यांनी जाब विचारत गैरहजर बिडिओसह कर्मचाऱ्यांच्या रिकाम्या खुर्च्यांना पुष्पहार घालून गांधीगिरी आंदोलन केले होते. पंचायत समितीसह अनेक शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक पद्धत बंद असून अधिकारी,कर्मचारी मनमानी पद्धतीने आपल्या वेळेनुसार ऑफिसला केवळ भेटी देतात. घरी बसून किंवा एखाद्या हॉटेल वरून कामकाज चालवतात. त्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांच्या समस्या सुटण्यापेक्षा त्यांना उलट आर्थिक भुर्दंड बसतो. अनेक कार्यालयात साहेब दौऱ्यावर आहेत असे उत्तर नेहमीच मिळते. तहसीलदार व पोलीस निरीक्षक वगळता कोणतेही अधिकारी कार्यालयात क्वचितच भेटतात. किमान कार्यालयीन वेळेत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दररोज मुख्यालयी असलेच पाहिजे अशी सक्ती त्यांना करण्यात यावी अशी मागणी या भेटीत काँग्रेसकडून प्रत्यक्ष करण्यात आली. याप्रसंगी डॉ. श्रावण रॅपनवाड सह काँग्रेस तालुका कार्याध्यक्ष संभाजीराव पाटील उंदरीकर, सेवादल प्रदेश सचिव अण्णासाहेब जाहीरे, युवक काँग्रेस शहराध्यक्ष जयप्रकाश कानगुले, एपीजे अब्दुल कलाम समितीचे अध्यक्ष एस.के.बबलू, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष इम्रान पठाण, शहर उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड, गजानन मोरे आदींसह अनेक काँगेस कार्यकर्ते उपस्थित होते.

तहसीलदार राजेश जाधव यांना निवेदन दिल्यानंतर डॉ.श्रावण रॅपनवाड प्रसिद्धी माध्यमांना म्हणाले की लवकरच महसूलमंत्र्याकडे सर्व तहसीलदारांना तालुक्यातील शासकीय कार्यालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांप्रमाणे तहसीलदारांना प्रशासकीय अधिकार दिले पाहिजेत अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात येईल.



लोकसभा क्षेत्रातील ता. सेनगाव, जि. हिंगोली येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सेनगाव तालुका सदस्य नोंदणी व आढावा बैठक पार पडली. यावेळी पक्ष प्रवेश सोहळा व पदाधिकारी नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी मी उपस्थित राहून "गाव तिथं शाखा घर तिथ राष्ट्रवादी" पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष मा बी. डी. भाऊ बांगर, विधानसभा नेते प्रकाश भाऊ थोरात, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सिताराम मामा जवळेकर, विधानसभा अध्यक्ष बबनराव गलांडे, सेनगाव तालुकाध्यक्ष विकासजी शिंदे, हिंगोली तालुकाध्यक्ष रवि डोरले, युवक प्रदेश सचिव सुजय देशमुख, कळमनुरी तालुका अध्यक्ष विजयराव गावंडे, सूरज वडकुते, देविदासराव गाडे, अतिक अत्तार, सचिन मस्के, बाळासाहेब मस्के, प्रकाश पाटील, नारायण पाटील, मोहन पाटील, कळमनुरीचे मैड मामा व ईतर पदाधिकारी कार्यकर्ते आदी उपस्थित होते.



# महिला दिनानिमित्त शिक्षक भारती शाखा फुलंब्रीतर्फे भेटवस्तू देऊन सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील महिला दिनानिमित्त फुलंब्री तालुक्यातील शिक्षकांच्या हक्कासाठी शिक्षकांच्या सन्मानासाठी महिला दिनानिमित्त महिला शिक्षिका तसेच मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी महिला शिक्षिका जवळजवळ 300 महिला शिक्षकांचा शिक्षक भारती शाखा फुलंब्री तर्फे भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले सत्कार अर्थ महिला शिक्षकांनी शिक्षक भारती शाखा फुलंब्रीचे मनापासून आभार मानले.

# दहावीच्या परीक्षा देणारी विद्यार्थिनी कु.सुनेरा शेख हीचे अकस्मात निधन

## शेख परिवारासह देगावनगरीवर दुःखाचा डोंगर

आधुनिक केसरी न्यूज

**तानाजी शेळगांवकर**

**नायगाव :** दि १२ मार्च हा दीन पूज्य साने गुरुजी विद्यामंदिर



देगांव येथील वर्ग दहावी ची परीक्षार्थी विद्यार्थिनी सुनेरा शादुल शेख रा.देगाव वय १५ वर्ष हिचे अल्पशा आजाराने निधन झाले. वडीला सोबत बसुन अभ्यास करतांना वडिलांच्या मांडीवरच तिने अखेरचा श्वास घेतला. सायन्स पेपरचा अभ्यास करते वेळेस अचानक ती कोसळली चिमुकल्या सुनेराचा जागीच मृत्यु झाला .सदर घटना 12 मार्च बुधवारी सकाळी घडली. शेख परिवारासह गावकऱ्यावर दुःखाचा डोंगर कोसळला असून साने गुरुजी विद्या मंदिर ही या घटनेने दुःख सागरात बुडाले.

संपूर्ण शाळेतील गुणवंत विद्यार्थीनी पैकी एक शांत स्वभावाची सुनेरा ही विद्यार्थीनी होती. सर्व पेपर आतीशय सुंदर सोडवली. आज च्या पेपरची पर्ण तयारी करुन बसली असता. सकाळी ७ वाजता शेवटची नजर पुस्तकावर टाकताना तिचे अचानक निधन झाले. तिच्या पध्छात आई वडील दोन भाऊ असा परीवार आहे. शाळेमध्ये तीच्या आत्मा ला शांती लाभो या दृष्टीने दोन मिनीटाची श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली . या घटनेने शाळेतील सर्व मुले मुली भावूक झाले होते. विद्यार्थिनी गेल्याचे दुःख शिक्षकावर.. तर मैत्रिन गेल्याचे दुःख सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होते. अनेक जन ओक्साबोक्सी रडत होते.दुःखाचा बांध अनावर झाला होता. शाळेच्या इतिहासात शिक्षणाची परीक्षा देतना जीवनाची परीक्षा हरणारी सुनेरा ही अनेका च्या काळजाला हूर हूर लावून जग सोडून गेली.

# धुळवळीला नागपुरात कापले पंधरा हजारांवर बोकड

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** होळीच्या दिवशी मटण, चिकनची विक्रमी विक्री वाढली. शुक्रवारी होळीचा आनंद घेणाऱ्यांचा मांसाहारी होण्याचा उत्साह महागडा चिकन आणि मटणाने कमी केला नाही. नियमित किमतीपेक्षा धुलीवंदनाच्या दिवशी जास्त होती. शहरातील विविध भागात चिकन आणि मटणाच्या दुकानांवर रांगा लागल्या होत्या आणि ते होळीच्या दिवसाचे वैशिष्ट्य राहिले. विशेष म्हणजे नागपुरात धुळीवंदनाच्या दिवशी जवळपास १५ हजाराहून अधिक बोकड कपल्याची माहिती मोमीनपुरा येथील एका व्यापाऱ्याने दिले तर इंडियन बॉयलरच्या खान यांनी सांगितले की मटणापेक्षा चिकनाला अधिक मागणी होती. आज शुक्रवार असल्याने जवळपास दहा टणाहून अधिक चिकन विकल्याची माहिती त्यांनी दिली. होळीच्या आदल्या दिवशी राज्यात सर्वत्र होलीका दहनाचा कार्यक्रम होतो. यावेळी होळीला पुरणपोळीचा नैवेद्य दिला जातो. दुसऱ्या दिवशी सर्वजण रंग खेळतात. रंग खेळत असताना यासोबत अनेक व्यक्ती मांसाहार करतात. त्यामुळे बाजारात सर्वत्र मटन विक्री सुरू आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# कळस जि.प. शाळेचा वर्धापनदिन केक कापून साजरा

## आकर्षक रोषणाई, स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**कळस बुद्रुक :** चिमुकल्या विध्यार्थ्यांचा अप्रतिम नृत्य अविष्कार कार्यक्रम, फटाक्यांची आतिषबाजी, संपूर्ण शाळेसह गावात केलेली नयनमनोहर रोषणाई, केक कापून, गावजेवणाने, माजी विध्यार्थ्यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

कळस बुद्रुक (ता. अकोले) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवारी वार्षिक स्नेहसंमेलन व शाळेचा १२० वा वर्धापन दिनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी अगस्ती देवस्थान चे विश्वस्त हभप विष्णू महाराज वाकचौरे हे होते. यावेळी जिल्हा परिषद चे अर्थ व बांधकाम समिती चे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, सरपंच राजेंद्र गवांदे, जयकिसान दूध संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब वाकचौरे, अगस्ती कारखाना संचालक सीताराम वाकचौरे, संगमनेर कारखाना संचालक संभाजी वाकचौरे, अकोले कृषी उत्पन्न बाजार



समितीचे संचालक ईश्वर वाकचौरे, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष नामदेव निसाळ, हभप गणेश महाराज वाकचौरे, हभप अरुण महाराज शिर्के, पत्रकार अमोल शिर्के, स्वाभिमानी सचिव संघटनेचे राज्य अध्यक्ष गणेश रेवगडे, शिक्षणाधिकारी श्री अभयकुमार वाव्हळ, शालेय पोषण आहार अधीक्षक अरविंद कुमावत, विस्ताराधिकारी माधव हासे, गोवर्धन ठूबे, केंद्रप्रमुख शकील बागवान उपस्थिती होते. शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची सुरुवात श्री गणेशाच्या वंदनेने झाली. यावेळी प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या शिवाजी महाराज नाटिकेने अंगावर रोमांच उभे राहिले, अफजल खानाच्या वधाने हर हर महादेव, शिवाजी महाराज की जय च्या घोषणांनी मैदान दुमदुमले. दुसरी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले सावळा कुंभार नाटकाने प्रेक्षकांचे डोळे पानावले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनावर आधारित गाणे ने सर्वांचे मन जिंकले, कीर्तन व दिंडी सोहळयाने प्रत्यक्षात पंढरी अवतरली, सिंधुताई सपकाळ यांचे एकपात्री अभिनयाने मन जिंकले, इंदूरिकर कॉमेडी व कोंबडा कापता है या गिताने मनमुराद हसवले, लावणी नृत्याने तमाशात बसल्याचा आनंद उपभोगला. फ्युजन डान्स, इ. कार्यक्रमाला प्रेक्षकांनी भर भरून दाद दिली.

या कार्यक्रमाचे स्वागत प्रास्तविक मुख्याध्यापक तान्हाजी वाजे व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री विष्णू वाकचौरे यांनी केले. सूत्रसंचालन संगीता दिघे,योगेश थोरात यांनी केले. माधवी गोरे, हर्षल सोनवणे, संपत भोर, स्वप्ना गुरव, सुवर्णा जाधव, पुष्पा सूर्यवंशी, वृषाली बर्वे, कैलास भागवत, श्री यासिर सय्यद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य अशोक ढगे, ज्ञानेश्वर वाकचौरे, इम्रान सय्यद, मनीषा वाकचौरे, सुवर्णा ढगे, गीतांजली वाकचौरे यांनी सहकार्य केले.



# कविता हे भावभावनांचे प्रगटीकरण होय : प्रा. राम धारासूरकर

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** माणसाचे व्यक्तिमत्व बालवयापासून घडत असते. माणसाचे विचार, भावना, कल्पना व वर्तन ही त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत असतात तर व्यक्तिमत्व विकास नैसर्गिकरित्या होत असला तरी त्याला हेतू पुरस्कार प्रयत्नाने सुद्धा घडविता येते. कविता हे मानवी भावनांचे प्रगटीकरण असते, असे अभ्यासपूर्ण विचार डॉ. राम धारासूरकर यांनी बोलून दाखविले. ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित नांदेड जिल्हास्तरीय युवक युवती विशेष शिबिरात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, व्यक्तिमत्व हे त्याच्या स्वभावाचा, वर्तणुकीचा, चारित्र्याचा आणि बुद्धिमत्तेचा भाग असतो. भावभावना,संवेदनशीलता यांनी माणूस घडत असतो. या घडण्यात साहित्याचे योगदान ही महत्त्वाचे आहे. लेखक भावभावनांच्या प्रगटीकरणामुळे लेखन करण्यास प्रवृत्त होत असतो. " कवितेतून व्यक्तिमत्व विकास" या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सौ अश्विनी बारसकर ह्या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. बी.व्ही. पुल्लागोर, प्रा. डॉ. श्याम पाटील यांची उपस्थिती होती. 'मूल्याधिष्ठित लोकशाहीत युवकांचे योगदान' या विषयावर राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.बी. व्ही. पुल्लागोर म्हणाले की, भारतीय लोकशाही ही जगातील अतिशय उत्कृष्ट लोकशाही असून आपल्या पंतप्रधानांनी ही लोकशाही मूल्याधिष्ठित करण्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत तर डॉ. श्याम पाटील यांनी '21 व्या शतकातील युवकांपुढील आव्हाने' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. काळानुसार विद्यार्थ्यांनी बदलणे गरजेचे आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला तरच आजचा युवक स्पर्धेत टिकू शकतो, असे विचार त्यांनी याप्रसंगी मांडले. 'भारतीय समाज आणि स्त्री शिक्षण' या अनुषंगाने अध्यक्षीय समारोप डॉ. सौ बारसकर मॅडम यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश कदम याने केले तर आभार ओंकार कुरशिंगे स्वयंसेवकांनी मांडले. कु. नेहा मडावी, वैभव गीते, साई पाचपुते, नितीन राठोड या विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य तथा कार्यक्रमाधिकारी प्रा. एस एस डोईबळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव पाटील, सहकार्यक्रमाधिकारी प्रा.सगरोळे, प्रा. गोरगिळे, प्रा. मंदेवाड तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरकुल योजनेमुळे अनेक बेरोजगारांच्या हाताला मिळतोय रोजगार

आधुनिक केसरी न्यूज

**सुभाष चौगले**

**कुडूत्री :** प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) काम गावागावात युद्धपातळीवर सुरू असल्याने नवीन घरकुल होऊन अनेकांचे घर बांधणीचे स्वप्न साकारले जाणार आहे. याच घरकुल बांधणीमुळे अनेकांना रोजगाराची संधी प्राप्त झाली असून निराधार, गरजवंत लोक यांना हाताला काम मिळणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना २०२५ घरकुल योजनेअंतर्गत गावागावात घरकुले मंजूर झाली असल्याने घरकुले बांधण्यासाठी घरकुल लाभार्थी पुढे सरसावले आहेत. घरासाठी लागणारे साहित्य विटा, चिरा, वाळू, सळी, सिमेंट आदी सर्व बांधकाम साहित्य मिळवण्यासाठी धडपड सुरू आहेच. त्याच बरोबर या सर्व व्यावसायिकांबरोबर वस्तू ने - आण करण्यासाठी लागणाऱ्या वाहने याना आर्थिक लाभ होणार आहे.तसेच जे.सी. बी.ट्रॅक्टर,ट्रक या वाहनांना देखील मोठी मागणी वाढली आहे. अनेक निराधार लोकांबरोबरच बांधकाम, सेंट्रींग मजूर, तसेच हाताखाली लागणारे मजूर यांनाही रोजगार प्राप्त होणार आहे. काही दिवस का असेना हाताला काम मिळणार आहे.

**बांधकाम मजुरांवर ताण :** बांधकाम करणारे व सेंटरिंग काम करणारे मजूर गावागावात मोजकेच असल्याने घरकुल मागणीसाठी लागणाऱ्या मजुरावर बांधकामाचा ताण वाढणार आहे. अनेकजण बांधकाम, सेंट्रीग मजूर मिळवण्यासाठी धडपड करताना दिसत आहेत.



# बांधकाम ठेकेदाराकडे लाचेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बांधकाम ठेकेदाराकडून सादर केलेले देयक मंजूरी, तसेच कामाची पाहणी करून अहवाल देण्यासाठी अडीच लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंत्यासह उपअभियंता, कनिष्ठ अभियंता महिलेविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुन्हा दाखल केला. तडजोडीत एक लाख ४२ हजारांची लाच घेताना एसीबीच्या पथकाने दोघांना पकडले. याप्रकरणी कार्यकारी अभियंत्यासह तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमंतर्गत बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील (दक्षिण विभाग) कार्यकारी अभियंता बाबुराव कृष्णा पवार (वय ५७), दौंड-शिरुर उपविभागातील उपअभियंता दत्तात्रेय भगवानराव पठारे (वय ५५), कनिष्ठ अभियंता अंजली प्रमोद बगाडे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. याबाबत एका बांधकाम ठेकेदाराने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मंठा येथे धरणे आंदोलन; बिहार सरकार जागे व्हा !

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मंठा शहरातील व तालुक्यातील बहुसंख्य बौद्ध बांधवांनी धरणे व आंदोलन केले (दि.१२) रोजी करण्यात आलेल्या आंदोलनात मंठा तालुक्यातील संपूर्ण बौद्ध बांधव आपले पक्षीय हेवेदावे बाजूला ठेवून या आंदोलनात सहभागी झाले होते.

या आंदोलनाची रॅली १२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजी महाराज चौकातून घोषणा देत मुख्य रस्त्याने निघाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला अभिवादन करून छत्रपती शिवाजी महाराज चौकात छ. शिवरायांच्या स्मारकाला वंदन करून विसर्जित झालेल्या रॅलीचे रूपांतर धरणे आंदोलनात झाले. भारतीय बौद्ध महासभा शाखा मंठा व वंचित आघाडी मंठा तालुका च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये पूज्य भदंत डी.शीलरत्न थेरो यांच्या उपस्थितीत धरणे व निदर्शने करण्यात आली. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना पूज्य भदंत डि.शिलरत्न थेरो म्हणाले की, मंदिर,मस्जिद, गुरुद्वार, चर्च इत्यादी धार्मिक स्थळे ही जशी ज्या त्या धर्माच्या ताब्यात असतात ; परंतु बौद्धगया हे एकमेव महाबोधी महाविहार हे बौद्धांच्या ताब्यात नाही...१९४९ चा बुद्धगया मंदिर कायदा रद्द करून महाबोधी महाविहार लवकरात लवकर बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे. युनोस्को' कायद्यानुसार बुद्धगया येथील महाबोधी महाविहार ही जागतिक धरोहर असूनही ही बौद्ध विरासत सध्या ब्राह्मणाच्या ताब्यात असल्याने संविधान कलम १३, १४, १५, २५ व २६ च्या कलमांचे पूर्णतः उल्लंघन आहे. याठिकाणी गौतम बुद्धांना ज्ञान प्राप्त झाल्याने सम्राट अशोकांनी निर्माण केलेले हे महाविहार जगातील सर्वच बुद्ध अनुयायींच्या अस्मितेचा विषय आहे म्हणून आता कोणत्याही परिस्थितीमध्ये हे महाबोधि विहार मुक्त करून घेण्याची योग्य वेळ आलेली आहे असे भदंत डि.शिलरत्न म्हणाले. यावेळी डॉ.धोंडोपंत मानवतकर म्हणाले की, सम्राट अशोक यांनी चोऱ्यांशी हजार बांधलेले स्तूप गेले कुठे ? तर त्या सर्व ८४ हजार स्तूपांचे रुपांतर मंदिरात करण्यात आले असल्याचे उघड दिसते. या बौद्ध धम्मीय विरासतीला आता या विद्यमान सरकारने



आमच्या ताब्यात द्यावे. डॉ.किशोर त्रिभुवन म्हणाले की, आमची ही मालमत्ता परत मिळविण्यासाठी आम्ही हा लढा एकजुटीने लढण्याची योग्य वेळ आलेली आहे. रंगनाथ बापू वटाणे, भारत उघडे, सुभाष जाधव,अंबादास खरात, लक्ष्मणराव वाघमारे यांनीही आंदोलनप्रसंगी आपला आक्रोश मनोगतातून व्यक्त केला. अध्यक्षीय समारोपात प्रा.सोनाजी कामिटे म्हणाले की,बुध्दगया महाबोधी विहार हे केवळ भारत देशाचेच नव्हे, तर जगभरातील बौद्धांचे श्रध्दास्थान असून महाविहाराचे व्यवस्थापन हे बौध्दांच्या ताब्यात देण्यात यावे, ते गैरबौद्धांपासून मुक्त करण्यात यावे, यासाठी हे आंदोलन आता थांबणार नाही. तर तीव्र करण्यात येईल याची बिहार सरकारने नोंद घ्यावी. भारताच्या महामहीम राष्ट्रपतीं यांच्या नांवे देण्यात आलेले निवेदन मंठा तहसिलचे नायब तहसिलदार काळदाते यांनी कार्यकर्त्यांकडून स्वीकारले. या निवेदनावर अरुण वाघमारे, दत्तराव चोरमारे, गौतम सदावर्ते, गौतम अंभोरे, रमेश खरात, शरद मोरे, नंदकिशोर प्रधान, अशोक अवचार, दीपक शेळके, विठ्ठल ठाकरगे, गंगाराम गवळी, सिद्धार्थ खरात, सहदेव अंभोरे, मिलिंद अंभोरे, सुमेध आवारे, करण वटाणे, अजय गोंडगे, शुभम अंभोरे, अशोक रणवीर, विकास प्रधान, नितीन खाडे, विश्वंबर वटाणे, भगवान वाघ, किरण गवळी, शुभम वाघमारे, मंगेश गवळी, स्वप्नील गोंडगे, धम्मानंद वाघमारे, दीपक बनसोडे, यश जाधव, सचिन खंदारे, भीमराव मुंढे, नरेंद्र वाघमारे, दादाराव वाघमारे, व्ही. बी मोरे, महेंद्र मोरे, ज्योती खाडे, जया आखाडे, वर्षा आखाडे, छाया खरात, सुषमा मगर, चंद्रकला कांबळे, विमल गायकवाड, सुशीला बनसोडे, मगर संगीता, गायकवाड, कांता कांबळे, सुनीता कोल्हे, सरस्वती कांबळे, प्रयागबाई कांबळे, बायजाबाई चोरमारे,कविता मोरे, मनोरमा पंडित, रचना मोरे,उज्वला मोरे, रेखा प्रधान, रमा वाघमारे, अनिता वाघमारे, आदिती खरात, आदिती खंदारे, अक्षरा वाघमारे, पूर्वी खंदारे, अमित खरात उद्धव सरोदे, गोलू पांजगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. शांततेत पार पडलेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र टेकुळे यांनी केले, तर अतुल खरात यांनी आंदोलनात सहभागी बांधवांचे आभार मानले. धरणे, आंदोलनाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.



चंद्रपूर जिल्ह्यातील जंगलाने वेढलेल्या आसेगाव - गिलबिली मार्गावरील मावळतीच्या सुर्याने खुलवलेलं डांबरी रस्त्याचं सौंदर्य टिपलंय आमचे जिल्हा प्रतिनिधी प्रा. शाम हेडाऊ यांनी.



# रंगोत्सवाने बाबरा येथील श्री बालाजी विवाह सोहळ्यास प्रारंभ; ध्वजपूजनाने मंडप उभारणी

## श्रींची पालखी मिरवणूक 24 मार्चला

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील बाबरा येथील ग्रामदैवत श्री बालजींच्या विवाह सोहळ्यास रंगोत्सवाने प्रारंभ करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी होळी ते गुढीपाडवा या पंधरवड्यात हा सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात येत आहे. गुरुवारी होळीला रात्री १० वाजता परंपरेनुसार श्री बालाजी मंदिरात भगवंताला रंग लावून भाविकांनी मनसोक्त रंगाची उधळण केली. (दि.14)शुक्रवारी सकाळी ११ वाजता मंदिरासमोर ध्वजपूजन सुभाष पुजारी यांच्या मंत्र उच्चाराने करण्यात आले.

सायंकाळी ५ वाजता मंडपाची उभारणी करण्यात आली. नंतर अभिषेक,आरती व पंधरवड्यातील दररोजच्या महाप्रसादाला प्रारंभ करण्यात आला. हा मंडप पडल्यानंतर गावातील ग्रामस्थ व भाविक पंधरा दिवस चालणाऱ्या श्री बालाजी विवाह सोहळ्यानिम्मित पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या नियमांचे पालन करतात.यात मुख्यतः दाढी कटिंग, नवीन घर बांधणी, विवाहाची बोलणी, कोणताही नवीन व्यवहार, मांसाहार न करणे आदींसह अनेक नियमांचे ग्रामस्थ तथा भाविक कडेकोट पणे पालन करतात. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे श्रींची पालखी मिरवणूक(दि24)मार्च सोमवारी काढण्यात येणार आहे. (दि25)मार्च मंगळवार रोजी लळीत, काल्याचे कीर्तन व भव्य कुस्त्यांची दंगल रंगणार आहे. श्री बालाजी यात्रा उत्सव काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे



आयोजन करण्यात आलेले आहे.सर्व बालाजी भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आव्हान श्री बालाजी विश्वस्त मंडळा तर्फे व समस्त बाबरा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# उद्योगनगरीत सामाजिक कार्यकर्त्यांचा ऊत; संघटनेकडून उद्योजकांना वाढला त्रास

आधुनिक केसरी न्यूज

**डॉ. संजय काळे**

**वाळूज महानगर :** बजाजनगर हा परीसर म्हणजे आशिया खंडातील सर्वात मोठा परीसर आहे. या औद्योगिक परिसरात अनेक भागातून नागरीक उदरनिर्वाहासाठी आले आहेत. या वसाहतीत सामाजिक कार्यकर्त्यांच्या नावावर उद्योगपतीना चांगलीच डोकेदुखी वाढत आहे. काही दिवसांपूर्वी पोलिस प्रशासन आणि उद्योगपती यांनी थेट आयुकताकडे तक्रारी केल्या आहेत. आता तर डायरेक्ट फर्मान निघालेत की, कोणत्याही आरटीआय अंतर्गत कंपन्यासमोर उपोषण करता येणार नाही.

हा झाला डायरेक्ट कंपन्याना शासकीय कायदया पुढे करीत त्रास देण्याचा मुख्य प्रकार! याच बजाजनगर परीसरात सामाजिक संस्था, बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, मंच, मंडळ स्वंम होषीत सामाजिक कार्यकर्ते ठरवत या भागातील शैक्षणिक संस्था, मोठं

वाळूज औद्योगिक वसाहतीत कोणालाही विनाकारण त्रास देणाऱ्यांची गय केली जाणार नाही . उद्योजकांच्या माध्यमातून तक्रारी आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल – **रामेश्वर गाडे पाटील,पोलीस निरीक्षक– वाळूज एमआयडीसी**

सामान्य लोकांना व वैयक्तिकरित्या तकलीफ होऊ नये अशी आमची मागणी आहे – **विशाल खंडागळे, नागरिक – बजाजनगर**

मोठ्या कंपन्या, उद्योगपती, खाजगी शिकवणी वर्ग यांना देखील सतत वेगवेगळे पद्धतीने त्रास होत आहे. अशी परीसरातील नागरीकांच्या वतीने ओरड होतांना दिसत आहे. बजाजनगर भागात सामाजिक कार्याचे प्रलोभन दाखवून शासकीय निधी पदरात पाडून घेण्याची अनेकांची धडपड होताना परीसरातून समजते आहे. या भागातील सर्वांगीण विकासात मुलभूत नागरी सुविधाकरीता अनेक भाग अजूनही त्रासलेले आहेत अशीही नागरिकांतून चर्चा होत आहे. बजाजनगर भागात स्वयं होषीत सामाजिक कार्यकर्ते आणि सामाजिक संस्था परीसरातील उदयोगासाठी मोठा अडथळा ठरतांना कळते आहे.

# ज्ञानसुधा प्राथमिक विद्यालय बाबरा शाळेत १६वे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**फूलंब्री :** ज्ञानसुधा शिक्षण प्रसारक मंडळ बाबरा संचलित ज्ञानसुधा प्राथमिक विद्यालयात दिनांक १२ मार्च २०२५ रोजी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले या संमेलनाचे उद्घाटन शिवव्याख्याते तथा लेखक प्रा.डॉ.संजयजी गायकवाड सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष माननीय श्री नंदकुमारजी गाडेकर साहेब होते तथा व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती संस्थेचे मार्गदर्शक मा.श्री शिवाजी अण्णा मैंद, संस्थेचे अध्यक्ष मा.श्री गणेशजी मैंद, मा.श्रीमती वैशालीताई काळे संचालिका राजमाता सोशल वेलफेअर फाउंडेशन,गावाच्या प्रथम नागरिक सरपंच यमुनाबाई प्रभाकर वाघ, प्रभाकर नाना वाघ, यशस्वी उद्योजक भारतभाऊ चौधरी, दैनिक सामनाचे प्रतिनिधी रविंद्र भाऊ पिंपळे, सामाजिक कार्यकर्ते नवाबभाई शेख,सामाजिक कार्यकर्ते तातेराव भुजंग, उद्योगपती मा.भगवान शेठ जंगले, नाचनवेल ग्रामपंचायत सदस्य मा.श्री. भूषणभाऊ शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य मा.श्री विठ्ठल बाबा पाथरे,गावाचे माजी पोलिस पाटील रामकृष्ण पाटील मैंद,ग्रामपंचायत सदस्य डॉ .अंबादासजी काथार, शाळेचे मुख्याधापक श्री बालाजी रसाळ हे होते,कार्यक्रमांचे प्रमुख आकर्षण चार्ली चॅप्लिन यांच्या भूमिकेत मा.सोमनाथ स्वभावाने हे होते. कार्यक्रमांचे उद्घाटन मंचावरील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यामध्ये नटराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, विद्येची देवता सरस्वती,भारतमाता प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. कार्यक्रमातील प्रमुख अतिथींचे स्वागत इयत्ता ५वी च्या मुलींनी स्वागतगीतांने केले,या वेळी प्रमुख अतिथी,कार्यक्रमाचे उद्घाटक ,कार्यक्रमांचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले,तथा चार्ली चॅप्लिन यांनी विद्यार्थांचे मनोरंजन करून कार्यक्रमात रंगत आणली. या प्रसंगी मुख्य कार्यक्रमाची सुरुवात गणरायाच्या गाण्याने झाली इयत्ता बालवाडी ते सातवीच्या एकूण 18 नृत्य प्रकारांचा अविष्कार विद्यार्थ्यांनी दाखवला त्यात देशभक्तीपर गीत, बालगीत, लावणी, गोंधळ आदिवासी गीत, छत्रपती संभाजी महाराज, अयोध्या वापस आये राम, मनोरंजनात्मक गीत, होळीगीत, भांगडा,कॉमेडी डान्स, राजनीती गीत, या गीत प्रकारांचे सादरीकरण विद्यार्थांनी केले. यात सर्व विद्यार्थांनी उपस्थितांचे मने जिंकली, ज्ञानसुधा प्रांगण टाळ्याच्या गजराने अगदी दुमदुमले सर्वच पालकांनी कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमात एकूण २०० विद्यार्थी सहभागी होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन अभिषेक ढाकणे व भरत अवघड यांनी तर आभार रामेश्वर चोंधे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आशा क्षीरसागर, यशवंत साबळे,वैष्णवी वाघ, मेघा गोसावी यांनी परिश्रम घेतले.



# मोशीत वाहनांची तोडफोड करणाऱ्या आरोपींची पोलिसांनी काढली धिंड!

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी चिंचवड :** मोशीमध्ये दोन टोळक्यांनी काही वाहनांची तोडफोड केली होती. याप्रकरणी भोसरी एम.आय.डी.सी पोलिसांनी नऊ जणांना अटक केली आहे. नागरिकांमधील भीतीच वातावरण कमी करण्यासाठी या नऊ जणांची घटनास्थळावरून धिंड काढण्यात आली. बुधवारी रात्री दहाच्या सुमारास मोशी मध्ये दोन टोळक्यांमध्ये झालेल्या वादातून दोन ते तीन वाहनांची तोडफोड करण्यात आली होती.

बुलेटच्या आवाजावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर हाणामारीत झालं होतं. पैकी, काही जणांनी मोठा दगड घेऊन दुचाकी वाहनांची तोडफोड केली होती. या घटनेनंतर भोसरी एम.आय.डी.सी पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. अवघ्या काही तासांमध्ये आरोपींचा शोध घेऊन बेड्या ठोकल्या. आरोपींची घटनास्थळावरून धिंड काढण्यात आली. कान पकडून त्यांना त्या परिसरातून पोलिसांनी माफी मागायला लावली. बुधवारी दुपारी के.एस.बी चौकात देखील पाच ते सहा वाहनांची तोडफोड करण्यात आली होती. याप्रकरणी देखील आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या रस्त्यावर पार्क केलेल्या वाहनांना लक्ष केलं जात आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच मोठ नुकसान होताना दिसत आहे.

# जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेडकडून ऑरिक बिडकीन येथील व्यावसायिक इलेक्ट्रिक वाहन (ई-बस, ई- ट्रक) प्रकल्प उभारणीला वेग

## कार प्रकल्पासह हा प्रकल्प 2027 पर्यंत कार्यान्वित करण्याचा कंपनीचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ऑरिक बिडकीन औद्योगिक क्षेत्रात जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेडकडून व्यावसायिक इलेक्ट्रिक वाहन (ई बस आणि ई ट्रेक) उत्पादन प्रकल्प उभारणार आहे. हा प्रकल्प ३,६६,५३६.८४ चौ.मी. क्षेत्रावर विस्तारलेला असून, यातील १,३९,००० चौ.मी. क्षेत्रावर बांधकाम होणार आहे. या प्रकल्पासाठी १२,६८० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, २०२५च्या दुसऱ्या तिमाहीत प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होऊन डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण होणार आहे. सध्या या प्रकल्पाच्या पर्यावरणीय परवानगी प्रक्रियेवर काम सुरू आहे.

या प्रकल्पासाठी जेएसडब्ल्यू ग्रीनटेक कंपनीने १,४८७ कोटी रुपये दीर्घकालीन कर्जाच्या स्वरूपात उभारण्याचे नियोजन केले आहे, तर उर्वरित भांडवली गुंतवणूक जेएसडब्ल्यू समूहाकडून इक्विटी स्वरूपात केली जाणार आहे. १०० एकर क्षेत्रावर उभारल्या जाणाऱ्या या ग्रीनफिल्ड प्रकल्पात दरवर्षी १०,००० इलेक्ट्रिक बस आणि ५,००० इलेक्ट्रिक ट्रक निर्मितीची क्षमता असणार आहे. याशिवाय, बिडकीन येथे ५४६ एकर क्षेत्रात स्वतंत्र इलेक्ट्रिक कार उत्पादन युनिट स्थापन केले जाणार आहे. एकूण २७,२०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून ५,००० थेट आणि १५,००० अप्रत्यक्ष रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत.

जेएसडब्ल्यू समूहाचे संचालक" पार्थ जिंदाल यांनी माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, "आम्ही केवळ एमजी मोटर इंडिया (MG MOTOR INDIA) सोबतच्या संयुक्त उपक्रमापुरते मर्यादित राहणार नाही. आमचे ध्येय भारतात एक भक्कम इलेक्ट्रिक वाहन इकोसिस्टम उभारण्याचे आहे आणि आम्ही या क्षेत्रात नवीन संधी शोधण्यावर भर देत आहोत." महाराष्ट्रातील हा नवीन प्रकल्प जेएसडब्ल्यू च्या स्वयंपूर्ण इलेक्ट्रिक वाहन उत्पादन धोरणाचा भाग असून, भारतातील इलेक्ट्रिक वाहन उद्योगात स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी उभारला जात आहे.




जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेड (JSWGTL) ही एक खाजगी कंपनी आहे, जी डिसेंबर 2024 मध्ये स्थापन करण्यात आली. ही जेएसडब्ल्यू ग्रीन मोबिलिटी लिमिटेड (JSWGML) आणि इशेलॉन मल्टीव्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड (EMPL) यांची उपकंपनी आहे. जेएसडब्ल्यू ग्रीनटेक लिमिटेड कंपनी बीवायडी (BYD) कंपनीसोबत भागीदारी करून इलेक्ट्रिक व्यवसायिक वाहन निर्मीती करण्याचा विचार करत असल्याची माहिती, विविध ऑटोमोबाईल माध्यमातून समोर आली होती.

# नरसिंह पंचमी महोत्सवाला सुरवात; पाच दिवस भरगच्च कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे पाडळी (नृसिंहा ची) पंचमी महोत्सव ला सुरवात होत असुण पाच भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
शनिवार दि.१५ ते बुधवार दि.१९ पर्यंत दररोज पंचम महोत्सव राहणार आहे. महोत्सवात भिमाभाऊ चे चिरंजीव रविभाऊ अंजाळेकर यांचा दररोज लोकनाट्य तमाशा मंडळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. बुधवारी सायंकाळी शेरण्या कार्यक्रम नवसाच्या मुलांना नचविणे.गुरुवारी दि.२०रोजी सकाळी नरसोबा दर्शन व भव्य मिरवणूक कार्यक्रम तर संध्याकाळी खुशाली चा तमाशा आयोजित करण्यात आला आहे.पंचमी दरम्यान विविध धार्मिक व सामाजिक इतिहासीक जनजागृती व विविध देव देवतांचे मुखावटे दर्शन तर नाट्य गायन आदिचे सादरीकरण करण्यात येते.पंचमी यात्रा महोत्सव बघता नरसिंह मंदिर विश्वस्त तथा गावकऱ्यां कडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. नरसिंह मंदिर वर आता पासूनच दर्शनासाठी गर्दी दिसून येत आहे. तर मध्यांतरी अनेक भाविक



भक्त नरसिंहाच्या दर्शनासाठी गर्दी करुन असतात. पंचमी-यात्रा महोत्सव निमित्त राज्य भरातून मोठ्या संख्येने सहपरिवार भाविक भक्त पाडळी येथे हजेरी लावतात.

# वडगाव - जैतखेडा हद्दीपर्यंत केलेल्या पुलांना कठडेच नसल्याने अपघाताची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील वडगाव येथे व त्यापुढे जैतखेडा हद्द पर्यंत केलेल्या दोन तीन पुलांना ठेकेदाराने पुलकठडे न केल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. खुलताबाद -कन्नड हद्दीत शेवटच्या टप्प्यात सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभागीय कार्यालय खुलताबाद अंतर्गत पुल कामे करण्यात आली आहे. यात वडगाव येथे गावाजवळ व त्या पुढे दोन पुलाचे काम करण्यात आली मात्र तीन पुलावर आजुबाजुला कठडे  करण्यात आली नसल्याने ते पुलावरुन वाहनधारकांना ये ने - जाणे धोकेदायक वाटत आहे.व भविष्यात अपघात होण्याची शक्यता आहे. ठेकेदाराने कठडे केले की नाही.की ते कामात आहे की नाही.हे ठेकेदार व शाखाभियंता उपाभियंता यांना किंवा अंदाज पत्रकात कळेल परंतु मोठ्या उंचीचे पुलाचे काम केल्या वर पुलाला कठडे आवश्यक आहे. कारण उंच पुलावरुन वाहनधारकांना याचाअंदाज येत नाही. कठडे आवश्यक असताना ते करण्यात आले नाही.याकडे उपाभियंता यांनी पाहणी करून सहीनिसा करावी व ठेकेदारास कठडा करण्यास भाग पाडावे, अशी मागणी प्रवासी नागरिक व वाहन धारकांतून होत आहे.



# जिजाऊ ज्ञानमंदिरात रंगोत्सवाचा मनसोक्त आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** भारतीय संस्कृती प्रमाणे  विजयादशमी (दसरा) सणाला आपट्याची पाने सोने समजून  एकमेकांना  देण्याची प्रथा आहे. मकर संक्रातीला एकमेकांना तीळगूळ देऊन नात्यांमधील गोडवा आपण जपतो. वाढवतो. तसेच सिमग्याला एकमेकांना खारीक खोबराचे , साखरेचे हार देऊन नात्यातील गोडवा जपण्याची पूर्वीपासून चालत आलेली ही परंपरा आहे . त्याच सांस्कृतिक परंपरेचा धागा पकडून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल मध्ये दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी शिमगा अर्थात होळी व रंगपंचमी सणानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने साखरहाराचे वाटप करण्यात आले. शाळेच्या स्थापनेपासूनच शालेय विद्यार्थ्यांना शिमग्यानिमित्त साखरहार गळ्यात घालून सिमग्याच्या शुभेच्छा देण्याची परंपरा गेल्या पंधरा वर्षापासून जिजाऊ ज्ञानमंदिर शाळेनी पाळली आहे ती आजतागायत ही सुरू आहे. गुरुवार दि.१३ मार्च रोजी संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड , जगदीश जोगदंड , प्राचार्य जगदीप जोगदंड , पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व शिक्षक व वर्गशिक्षकांच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना साखरहार गळ्यात घालून शिमग्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांना नैसर्गिक कोरडे लावून त्याच्या समवेत रंगपंचमी खेळण्यात आली. रंग बरसे या व इतर होळीच्या गाण्यावर सर्व विद्यार्थ्यांनी चांगलाच ठेका धरून नाचण्याचा आनंद लुटला. संचालक ज्ञानोबा जोगदंड यांच्याहस्ते होळी पेटविण्यात आली. जल्लोषपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी एकच बोंब ठोकली .यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांशी संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड यांनी हितगूज साधले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज आहे. वाढते तापमान हा चिंतेचा विषय बनला आहे. म्हणून आपण सर्वांनी एक मुल एक वृक्ष लावून संगोपन केले पाहिजे. झाडे लावा , झाडे जगवा  , वृक्षतोड करू नका, पाणी आडवा पाणी जिरवा ,पाण्याची बचत करा, पाणी प्रदूषित करू नका, कचऱ्याची होळी करा किंवा कंपोस्ट खत बनवा. स्वच्छता राखा , निरोगी राहा.  , प्राणीमात्रावर दया करा, अज्ञानी राहू नका. अंधश्रध्दा बाळगू नका. अहंकार , व्देष , मत्सर, करू नका. आळस बाळगू नका.  पशुपक्ष्यांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करा.होळीला रासायनिक रंग वापरू नका. रासायनिक रंगापासून सावधान ! आपल्या डोळ्याला , शरीराला इजा होणार नाही याची काळजी घ्या. होळी पेटवताना इतरत्र आग लागणार नाही याची काळजी घ्या. मोठमोठी लाकडे जाळू नका.सणामध्ये रंगाचा बेरंग होईल असे कृत्य कुणीही करू नका. कुणाला शिव्या देऊन दुसऱ्याचे भांडण अंगावर घेऊ नका. हर्षोल्लाषात सणाचा गोडवा जपून आनंद घ्या. असा गुरुपदेश सांगून त्यांनी सर्वांना होळी व रंगोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षक , शिक्षिका , शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येनी उपस्थित होते. सर्वांनी होळी व रंगोत्सवाचा मनसोक्त आनंद लुटला.

# तेली समाज वधूवर पालक मेळाव्यात जुळले ३७ जोडप्यांचे लग्न

## राज्यस्तरीय मोफत वधूवर पालक परिचय मेळाव्यास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** तिळवण तेली समाजाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय मोफत वधूवर पालक परिचय मेळाव्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. या सोहळ्यात ९४३ वधूवरांनी सहभाग नोंदवून आपला परिचय करून दिला. यावेळी ३७ जोडप्यांचे लग्न जुळले असून, राज्यभरातील समाजबांधवांनी उपस्थिती लावली.
चिकलठाणा येथील मातोश्री लॉन्स येथे स्व. दैविदास बाबुराव साबने नगरीत रविवार, ९ रोजी सकाळी ११ वाजता वधूवर परिचय मेळाव्याचे उद्घाटन तैलीक महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री  जयदत्त आण्णा क्षिरसागर यांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करून संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांचे पुजन करण्यात आले. यावेळी खासदार संदीपान भुमरे, शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतुल चव्हाण, माजी जिप अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, अनिल मकरिये व तेली समाजचे सर्व तालुकाध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती होती.या परिचय मेळाव्यात अंध, अंपग विधवा, घटस्फोटीत व वेळवर आलेल्या मुला -मुलीचा परिचय करून घेतला. मेळाव्याला महाराष्ट्रातुन जवळपास ४ हजार समाज बांधव उपस्थित होते. मनोज संतान्से, विष्णूशेठ सिदलंबे, सुरेश मिटकर, नारायण दळवे, कपिल राऊत, भगवान मिटकर, गणेश वाघलव्हाळे, भिकन राऊत, ज्ञानेश्वर लुटे यांनी परिश्रम घेतले.  कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हाध्यक्ष सुरेश कर्डीले, प्रास्ताविक कचरु वेळंजकर यांनी केले.





# विविध मागण्यांसाठी पद्मशाली समाजाचे साखळी उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**

**मुखेड :** मुखेड येथे पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांना मुखेड तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित नांदेड जिल्हा पद्मशाली समाज संघटना जिल्हा अध्यक्ष माधव अण्णा साठे, तालुका अध्यक्ष जगन्नाथ रावजी अमृतवार, व पद्मशाली समाज युवक संघटना तालुका अध्यक्ष शिवा भाऊ बेळीकर व माजी उपनगराध्यक्ष संजयजी बेळीकर, रामदास बेतेवाड, संजय गोगुरुवार, बालाजी बेतेवाड, बाबुराव येलकटवार, दामोदर आडेपवार, देविदास अंचेवार, दीपक पुलगमवार, हनमंत कंदेवार, प्रकाशराव गुजलवार, विजयजी जलदावार, शिवाजी गुंडेवार, कृष्णा रामदिनवार, स्वप्निल चटलावार, आनंदराव बोडावार, ऋषभ राचेवार, लक्ष्मण ताटीपामल, माधव मादासवार, नरेश बेतेवाड, बजरंग ताटीपामल, बालाजी चेडेपल्लु, संदीप ताटीपामल, असंख्य पद्मशाली समाज बांधव उपस्थित होते.

# चिमुकल्यांनी पेटवली प्लास्टिकची होळी

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** होळी या सणानिमित्त जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी प्लास्टिक आणि कचऱ्याची अनोखी होळी साजरी करुन पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचा संदेश दिला. लाकडे, गोवऱ्या यांचा वापर न करता शाळा आणि शाळा परिसरातील कचरा गोळा करून तो पेटवून दिला.

यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विशेष काळजी घेत होळी साजरी केली. यासाठी वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांनी मदत केली. त्यांनीच तयार केलेल्या नैसर्गिक रंगांचा वापर करुन आज धुलीवंदनाच्या निमित्ताने रासायनिक रंग वापरु नयेत असा संदेश यांद्वारे व सोशल मीडियाद्वारेही दिला आहे.

वर्षभरात शाळेकडून प्रसंगानुरुप तसेच शालेय सहशालेय उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविले जातात. प्लास्टिक आणि कचऱ्याची होळी साजरी केली करताना सर्वांना पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी पाण्याचा गैरवापर टाळणे तसेच नैसर्गिक रंगाचा वापर करणे, इकोफ्रेंडली होळी साजरी करणे आदी संदेश देण्यात आला. चिमुकल्यांकडून ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करण्यात आला. त्यानंतर प्लास्टिकच्या बाटल्या, विविध खाद्यपदार्थांच्या वस्तूचे वेष्टन, रॅपर्स, रिकाम्या पाणी बॉटल्स, प्लॉस्टिकचे ग्लास, पाणी पाऊच, कॅरीबॅग, इतर प्लास्टिक वेस्टेजेस अशाप्रकारच्या कचऱ्याला एकत्रित करून जाळून नष्ट करण्यात आले. याकामी हैदर शेख आणि मनिषा गच्चे यांनी सहकार्य केले.



# साजापूर परीसरात होळी साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**वाळूज महानगर :** साजापुर गट न रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली .संघर्ष परिवार क्रांतीनगर दर वर्षी सामूहिक होळी व रंगपंचमी उत्सव साजरा करतात उपस्थित होते यावेळी  सामजिक कार्यकर्ते चरणसिंग महाराज ,कृष्णा घुले,विजय साळुंके,संदीप मोकळं,भारत पवार,विक्रम शिहरे,गणेश मगर,नामदेव सवाने,अशोक वाघमारे,ज्ञानेश्वर पाटील,निखिल पाटील,शिवाजी घुगे,प्रदीप धांडे,संतोष चव्हाण,गजानन गिरी,विकास पाटील,संदीप वाघोदे,विलास पाटील,सुधीर मिसाळ,बळीराम महाराज यादव, हरीचद्र शिंदे,गजानन दगडघटे ठेकेदार,गणेश पाटील,गंगाधर जाधव काका, झीले सर,मनोज हातकांगणे,दत्ता लांडे,दादाराव मते,साहेबराव जोगदंड पाटील,हेमराज चौधरी,देविदास जाधव, इंदल जाधव ,भारंबे सर,तसेच महिला मंडळ, बाल गोपाल आदींची उपस्थिती होती.

# स्वातंत्र्यसेनानी जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉमध्ये करिअर मार्गदर्शन कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉ, यवतमाळ येथे करिअर कट्टासह स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन कक्ष आणि करिअर समुपदेशन व मार्गदर्शन कक्षाच्या वतीने विशेष करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील संधी, तयारीचे मार्ग आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये याविषयी मार्गदर्शन देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजेश मुनोत होते. विशेष मार्गदर्शक म्हणून डॉ. साईनाथ वाडजे, संचालक वाडजे कॅरिअर ॲकॅडमी यवतमाळ यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना "स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी" यावर सखोल मार्गदर्शन केले. करिअर घडविण्यासाठी आवश्यक सुचना दिल्या. त्यांनी स्पर्धात्मक परीक्षा, न्यायव्यवस्था, प्रशासन, कॉर्पोरेट क्षेत्र, तसेच उद्योजकता याबाबत माहिती दिली. वाडजे करीअर अकडमी आणि अमोलकचंद महाविद्यालय व विधी महाविद्यालय यांचे मधे नुकताच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करण्यासाठी एमओयु करार झाला असून  यापुढे ईच्छूक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ज्ञांनी समाधानकारक उत्तरे दिली आणि योग्य दिशादर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता कक्ष समन्वयक डॉ.संदीप नगराळे  यांनी केले, सुत्रसंचलन आयशा खान यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. वैशाली फाले यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन कक्ष व करिअर समुपदेशन कक्षाच्या टीमने केले. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन उपक्रमाचा चांगला लाभ घेतला असून, भविष्यात असे उपक्रम नियमितपणे राबवावेत, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली.





# चार वर्षांत ३८ हजार गरजू रुग्णांना मोफत डायलिसिसचा लाभ

## एएनपी केअर फाउंडेशनतर्फे रहाटणी येथे पूर्णतः मोफत सुविधा; २० हजार रुग्णांवर फिजिओथेरपीचे उपचार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सामाजिक बांधिलकी आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून चार वर्षांपूर्वी सुरु केलेल्या एएनपी केअरफाउंडेशनच्या डायलिसिस केंद्रात ३८ हजार १९५ गरजू रुग्णांनी लाभ घेतला आहे. या डायलिसिस केंद्राला चार वर्ष पूर्ण झाल्याबद्दल कृतज्ञता, तसेच पॉलिकॅबसोशल वेल्फेअर फाउंडेशच्यावतीने उभारलेल्या विस्तारित कक्षाच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन केले होते.

यावेळी पॉलिकॅबइंडिया लिमिटेडचे प्रमोटरअजय जयसिंगानी, कार्यकारी संचालक राकेश तलाठी, सहयोगी उपाध्यक्ष नीरज कुंदनानी, एएनपीकेअर फाउंडेशनचे प्रमुख मनोहर फेरवानी, सुनील अडवाणी, सुरेश जेठवानी, सुरेश फेरवानी, रवी फेरवानी, अशोक वासवानी, ऋषी अडवाणी, जवाहर कोटवानी, नंदकुमार काटे यांच्यासह सिंधी समाजातील उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्यने उपस्थित होते. राकेश तलाठी म्हणाले, "समाजासाठी समर्पित भावनेने कार्यरत एएनपी केअर फाऊंडेशनशी जोडले गेलो आहोत याचा आनंद आहे. गोरगरीब रुग्णांना डायलेसिसचीसुविधा अनेकांसाठी नवसंजीवनी ठरली आहे. पॉलिकॅबइंडिया अनेक सामाजिक उपक्रमांतभरीव योगदान देत आहे. यापुढेही डायलिसिससाठी काही मदत लागल्यास आमचे सहकार्य राहील. मनोहर फेरवानी म्हणाले, "कोरोना काळात या डायलेसिस केंद्राची सुरुवात झाली. पहिल्या वर्षी या डायलिसिस केंद्रावर अकरा मशिन्स होत्या. पुढे त्यात आणखी भर पडली. सध्या एकूण २५ मशिन्स कार्यरत आहेत. दोन तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली जवळपस २५ प्रशिक्षित तंत्रज्ञ आणि स्टाफ डायलिसिस करत आहे. येथील स्वच्छता, रुग्णांसाठी असलेल्या सुविधांमुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.

डायलेसिससहफिजिओथेरपी उपचार केंद्र सुरु असून, तीन डॉक्टर ही सुविधा पुरवतात. पिंपरी–चिंचवडसह पुणे शहर, आंबेगाव व खेड तालुक्यातील गरजू रुग्णांना या सुविधांचा लाभ होत आहे. सोमवार ते शनिवार रोज सकाळी ८ ते संध्याकाळी ६ या वेळेत रुग्णांना डायलिसिस सेवा दिली जाते. गरजू रुग्णांनी रॉयल मायस्टिक, २८/2 ब, शिवराजनगर, रहाटणी, पिंपरी-पुणे येथे किंवा ९९७००४३००५/०६ किंवा CONTACT@ANPCAREFOUNDATION.ORG येथे नावनोंदणी करावी. अधिकाधिक गरजू रुग्णांनी या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा, असेही मनोहर फेरवानी यांनी नमूद केले.

# रक्षा खडसेंच्या मुलीची छेडछाड; आरोपी फरारच

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला शाखेच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी शुक्रवारी जळगावात धुलीवंदन सण साजरा केला आणि राज्यातील जनतेला होळी व धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर त्या म्हणाल्या, राज्य सरकारने राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेकडे लक्ष द्यावे. महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. अलीकडेच एक सर्वेक्षण झाले, ज्या सर्वेक्षणाच्या अहवालात असे म्हटले आहे की आशिया खंडातील महिलांसाठीच्या सर्वात असुरक्षित देशांपैकी भारत एक आहे. या यादीत भारताची गणना होणे हे भारतासाठी खूपच दुर्दैवी आहे.

रोहिणी खडसे म्हणाल्या, पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहिलेला नाही. गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती नाही. त्यामुळेच गुन्हेगारी घटना घडत आहेत. राज्यात कायद्याचा वचक असता तर गुन्हेगारी घटना घडल्या नसत्या. महिलांच्या सुरक्षिततेबाबत आपलं सरकार निरुत्साही आहे. महिलांच्या सुरक्षेतेकडे त्यांचे दुर्लक्ष होते असे मला वाटते. त्यामुळे महिलांच्या संरक्षणासाठी कडक कायदे करणे आवश्यक आहे. मला असे वाटते की, सरकारने लाडक्या बहिणींच्या सुरक्षिततेकडे देखील लक्ष देण्याची गरज आहे.